CMYK

२०
रमजान मुबारक
आज का इफ्तार
६.३९
कल की सहेर
५.१७

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १०० वा फोन २३०१०१ दिनांक १० मार्च २०२६ मंगळवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# हसावं की रडावं! प्रकाशदादांनी विधानसभेत मांडला ग्रामीण भागातील मुलांची लग्न होत नसल्याचा प्रश्न

**बीड दि.९ (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील माजलगाव मतदार संघाचे आ.प्रकाश सोळंके यांनी बीड जिल्ह्यातील तरुणांच्या विवाहाचा प्रश्न थेट विधानसभेत मांडला. ग्रामीण भागात शेती बरोबरच शेतीवर आधारीत सर्व व्यवस्था कोलमडली असून शेतकरी असणाऱ्या मुलांना कोणी मुली देत नाहीत, त्यामुळे प्रत्येक गावात ५० ते १०० मुलं अविवाहीत रहात आहेत, ही समस्या अत्यंत गंभीर होत चालली असून सरकारने यावर विचार करावा, असा प्रश्नच प्रकाशदादांनी मांडला. दादांनी जे मांडले ती वस्तुस्थिती आहे, मात्र अशा प्रश्नांची सोडवणूक विधानसभेत खरेचच होऊ शकते का? असा भाबडा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होऊ लागला आहे. दादांनी विधानसभेत मांडलेल्या या प्रश्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.**





राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात सोमवारी माजलगाव विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आ.प्रकाश सोळंके यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या एका प्रश्नाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु झाली आहे. ते सभागृहात म्हणाले की, प्रत्येक खेडेगावात ५०-१०० अशी मुलं की त्यांच वय वर्षे २५ ते ३० उलटून गेलेलं आहे. शेतीचा व्यवसाय साधारणत: करतात त्यामुळे त्यांना मुलीच मिळत नाही अशी परिस्थिती आहे. उलटं आता मुलींनाच हुंडा द्यायची परिस्थिती निर्माण झाली आहे. यात फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. बोगस मुली आणतात, लग्न करतात, एकाच मुलीचे दोन दोन, तीन तीन लग्न झालेले असतात. हे असे फसवणुकीचे प्रकार अडीच ते तीन लाख रुपये घेऊन दलाल करत आहेत. सरकारने या बाबत पान २ वर

## विशेष योजना आखू -राज्यमंत्री भोयर

आ.प्रकाश सोळंके यांनी मांडलेली ही वस्तुस्थिती राज्य सरकारने गांभीर्याने घेतली आहे. यावर उत्तर देतांना राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, आ.प्रकाश सोळंके यांनी मांडलेली माहिती ही वर्तमान परिस्थितीचे वास्तव चित्र आहे. शासन या बाबीची गंभीर दखल घेणार असून संबधीत सुचनांचा अभ्यास करुन आवश्यक त्या उपाययोजना आणि योजना तयार करण्याबाबत विचार केला जाईल असे त्यांनी सभागृहात स्पष्ट केले. दरम्यान प्रकाश सोळंकेंच्या प्रश्नावर तेवढ्याच तत्परतेने राज्यमंत्री भोयर यांनी उत्तर दिले. आता राज्य सरकार लग्नाळू तरुणांसाठी काय उपाययोजना करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बाहेरच्या राज्यातून मुली आणून फसवणुकीचे प्रकार

बीड जिल्ह्यात विशेष करुन आंध्र, कर्नाटक, बिदर येथून मुली आणून तुमचे विवाह लावून देतो अशी एक दलालाची टोळी कार्यरत आहे. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात अशाच प्रकारे एका युवकाची फसवणूक झाली होती तर काही दिवसापुर्वी आष्टी येथेही असा प्रकार घडला आहे. एकाच मुलीचा सौदा करुन ते दलाल दोन-दोन तीन-तीन मुलांबरोबर तिचे लग्न लावून देतात. एक लग्न झाले की ती मुलगी पळून जाते असे प्रकारही वाढले आहेत. प्रकाशदादांनी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहासमोर मांडले. पान २ वर

## पत्र्याच्या शेडमध्ये सापडला गुटख्याचा साठा

### बीड शहर हद्दीत एलसीबीची कारवाई दोघांविरुद्ध गुन्हा



बीड दि.९ (प्रतिनिधी):- बीड शहरातील बशीरगंज भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये विविध कंपनीच्या गुटख्याची साठेबाजी करुन ठेवल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केलेल्या कारवाईत उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन १ लाख ६० हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बीड शहरातील बशीरगंज भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये गुटख्याची साठेबाजी करुन ठेवण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांना पान २ वर

### वारंवार कारवाई करुनही गुटखा येतो कुठून?

**बीड शहर आणि परिसरात पोलिसांकडून सातत्याने गुटख्यावर कारवाई केली जाते, आठवड्यातून किंवा १५ दिवसातून गुटख्याच्या बाबतीत एक-दोन कारवाया हमखास होतात. दोघा-तिघांवर गुन्हेही दाखल होतात. मात्र** पान २ वर

## शाळेचं गेट कोसळल्यानंतर शिक्षण विभागाला आली जाग

# सर्व प्रकारच्या दुरुस्त्या करुन घ्या अन्यथा घटना घडल्यास मुख्याध्यापक जबाबदार

### शिक्षणाधिकारी कुंवर यांनी सर्व शाळांना काढले आदेश

**बीड दि.९ (प्रतिनिधी):- शहरातील अशोक नगर जिल्हा परिषद शाळेचे गेट कोसळून एक विद्यार्थी जखमी झाल्यानंतर बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला जाग आली आहे. प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती डॉ.किरण कुंवर यांनी दि.९ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापकांना पत्र पाठविले आहे. शाळेतील नादुरुस्त साहित्याची दुरुस्ती किंवा निर्लेखन करुन घ्या अशा सुचना त्यांनी दिल्या आहेत. शाळेतील सर्व प्रकारच्या दुरुस्त्या करुन घ्या जेणेकरुन अशा घटनांची पुनर्रावृत्ती होणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. सदरील सुचनांचे तात्काळ पालन करा, यानंतर काही घटना घडल्यास संबंधीत मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल अशी तंबी देखील शिक्षणाधिकारी कुंवर यांनी मुख्याध्यापकांना दिली आहे.**



बीड शहरातील बार्शी नाका भागातील अशोक नगर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे लोखंडी गेट दि.६ मार्च २०२६ रोजी अचानक कोसळले, यामध्ये एक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना घडली. सदरील घटनेची पुनरार्वृत्ती होऊ नये म्हणून शिक्षणाधिकारी कुंवर यांनी सर्व मुख्याध्यापकांना पत्र काढले आहे. शाळेच्या पटांगणात विद्यार्थ्यांच्या खेळणी, दर्शनी भागाचे किंवा इतर गेट, दरवाजे, खिडक्या इत्यादी तुटलेल्या स्वरुपात आहेत. विद्यार्थी पटांगणात खेळत असतात त्यावेळी त्यांना अशाच तुटक्या खेळण्यांपासून, दरवाजे-खिडक्यांपासून सजा पोहोचू शकते त्यामुळे तात्काळ सर्व प्रकारची दुरुस्ती करुन घेण्याचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले आहेत. पटांगणातील नादुरुस्ती खेळणी, झोके,सीसॉ, ग्रीन जीमचे साहित्य दुरुस्त करुन घ्यावेत किंवा काढून घेऊन निर्लेखन करावे. शाळेतील काही वर्ग खोल्यांमध्ये नादुरुस्त बेंच, खेळाचे साहित्य, टेबल खुर्च्या इत्यादी वस्तू दर्शनी गेट नादुरुस्त पान २ वर

## प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज ३१ मार्चपूर्वी भरावे

### फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांचे आवाहन



बीड दि.९ (प्रतिनिधी):- केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुलाचा लाभ घेण्यासाठी बीड शहरातील पात्र नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी अर्ज भरावेत, योजनेचे पोर्टल लवकरच बंद होण्याची शक्यता असल्याने इच्छुकांनी तातडीने ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

या योजनेसाठी अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची जागा असणे आवश्यक असून आधार कार्ड (संपूर्ण कुटुंबाचे), राष्ट्रीयकृत बँक खाते, PTR (नगर परिषद), खरेदीखत / PR कार्ड / ७/१२ उतारा तसेच उत्पन्न प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सर्व कागदपत्रांसह ऑफलाईन अर्ज नगर परिषद, बीड येथे जमा करणे बंधनकारक आहे.

बीड शहरातील पात्र नागरिकांनी लवकरात लवकर अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

बीड दि.९ (प्रतिनिधी):- शहरात अनेक भागात पाणपोईंची गरज निर्माण झाली आहे. उन्हाळा कडक पडला आहे. ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. तरी सामाजिक संघटनांनी याची दखल घेऊन पाणपोई उभाराव्यात अशी मागणी होत आहे.

# मोकळी मैदानं आणि रस्त्याच्या कडेला अंधारात पिणाऱ्यांनो आता पोलिसांचे रट्टे खाल

### सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्या ५९ जणांवर गुन्हे दाखल , नागरिकांच्या शांततेत व्यत्यय आणणाऱ्या मद्यपींना एलसीबीचा दणका

बीड दि.९ (प्रतिनिधी):- लातूर शहरात सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मद्यप्राशन करून धांगडधिंगा करणाऱ्या आणि नागरिकांच्या शांततेचा भंग करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कंबर कसली आहे. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) आतापर्यंत ५९ मद्यपींवर कायदेशीर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध खटले दाखल केले आहेत.

शहरातील मोकळी मैदाने, रस्त्यांच्या कडेला उभी असलेली ऑटोरिक्षा आणि अंधाराचा फायदा घेऊन उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांचे प्रमाण वाढले होते. यातूनच किरकोळ कारणावरून वाद होऊन गंभीर गुन्हे घडत असल्याचे समोर आले होते. यावर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक



श्री.अमोल तांबे यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. या पथकांनी शहरात विविध ठिकाणी छापे टाकून कारवाई केली आहे. एकाच दिवसात ३१ जण ताब्यात घेण्यात आले. मोहिमेच्या एकाच दिवसात ३१ मद्यपींना रंगेहात पकडून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. चार दिवसांत ५९ गुन्हे: गेल्या चार दिवसांत ही मोहीम सातत्याने राबवण्यात आली असून, एकूण ५९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत.पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ही मोहीम केवळ तात्पुरती नसून पान २ वर

### नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य नागरिकांनी केले समाधान व्यक्त

**सार्वजनिक ठिकाणी शिस्त आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. लातूर शहरातील सर्व पोलीस ठाणी आणि स्थानिक गुन्हे शाखा यांच्या समन्वयाने ही कारवाई केली जात आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होणार आहे.**

पाहिजेत
ऑफीस कामाकरिता
बीड शहरामध्ये
महिला कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे
संपर्क :: 9423470372

## आरटीई प्रवेशातील १ किमी अटीला न्यायालयाची स्थगिती

### पालकांना दिलासा

बीड दि.९ (प्रतिनिधी):- शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के प्रवेशाबाबत महत्त्वाची घडामोड घडली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारने लागू केलेल्या आरटीई पान २ वर

### निर्णयाचे स्वागत - मनोज जाधव

**दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयाचे आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला असून अर्ज दाखल करताना येणाऱ्या अडचणी दूर होतील. विशेषत: ग्रामीण भागातील पालक आणि त्यांच्या पाल्यांना या निर्णयाचा अधिक लाभ होणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.**

## सीटीईटी निकालानंतरच केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबवा

### जिल्हा परिषदेसमोर शिक्षकांचे उपोषण



बीड दि.९(प्रतिनिधी) :- जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने केंद्रप्रमुख पदोन्नतीचा घाट घातला आहे. सीटीईटी परिक्षेचा निकाल लागण्यापुर्वीच शिक्षण विभागाला ही प्रक्रिया राबवण्याची घाई का झाली आहे? असा प्रश्न उपस्थित करत आधी सीटीईटी परिक्षेचा निकाल लागू द्या आणि मग नियमानुसार केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबवा या मागणीसाठी शिक्षक संघटनांनी जिल्हा परिषदेसमोर सोमवारपासून पान २ वर

# जि.प.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची नावे नासासोबत जाणार चंद्रावर

बीड दि.९ (प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव येथील ४९ विद्यार्थ्यांसह तीन शिक्षकांची नावे थेट चंद्रावर पाठवली जाणार आहेत. नासा या आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थेच्या आर्टेमिस II मोहिमेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव विद्यार्थी आणि शिक्षकांचा शिक्षकांचा ऐतिहासिक सहभाग नोंदवला जाणार आहे. या विद्यार्थ्यांच्या नावाचे बोर्डिंग पास नासाकडून शाळेला प्रदान करण्यात आलेली आहेत. हा क्षण शाळेसाठी अभिमानास्पद आणि गौरवास्पद ठरत आहे.

नासा हे आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थेच्या आर्टेमिस II हे अंतराळ यान वैज्ञानिक शोध, आर्थिक फायदे आणि चंद्राचा शोध घेण्यासाठी चंद्रावर पाठवत आहे. आर्टेमिस II नासाच्या खोल अंतराळ क्षमतांची चाचणी घेईल, कारण मानव प्रथमच एसएलएस रॉकेट आणि ओरियन अंतराळयानावर उड्डाण करतील. अंदाजे १० दिवसांचे हे अभियान एप्रिल




**नासा या आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्थेकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेस मिळालेले बोर्डिंग पास..**

२०२६ च्या अखेरीस फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटर येथील लाँच कॉम्प्लेक्स ३९ वरून सुरू होईल. नासाचे अंतराळवीर रीड वाईजमन, व्हिक्टर ग्लोव्हर आणि क्रिस्टीना कोच तसेच सीएसए (कॅनेडियन स्पेस एजन्सी) अंतराळवीर जेरेमी हॅन्सन हे एसएलएस (स्पेस लाँच सिस्टम) रॉकेट, ओरियन स्पेसक्राफ्ट आणि सपोर्टिंग ग्राउंड सिस्टीममध्ये प्रवास करणारे अंतराळवीर आहेत. हे ट्रान्सलुनर यान अंतराळवीरांना पृथ्वीपासून २,३०,००० मैलांपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या आकृती आठ पॅटर्नमध्ये चंद्राच्या दूरच्या बाजूला चार दिवसांच्या बाहेर जाण्याच्या प्रवासावर पाठवेल. जास्तीत जास्त अंतरावर, क्रू चंद्राच्या पलीकडे पान २ वर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव येथील इ पहिलीतील ८, इ. दुसरीतील १०, इ.तिसरीतील १५ आणि इयत्ता चौथीतील १६ अशा एकूण ४९ विद्यार्थ्यांसह शाळेतील मुख्याध्यापक व २ शिक्षक यांची नावे सबमिट केलेली आहेत.सबमिट केलेली नावे एका एसडी कार्डवर समाविष्ट केली जातील. जी २०२६ मध्ये आर्टेमिस II मिशन चंद्रावर लाँच झाल्यावर ओरियनच्या आत उडेल,. हे विशेष..!

CMYK

# गॅस सिलिंडर आता २५ दिवसांनंतरच बुक होणार

नवी दिल्ली दि.९ (वृत्तसेवा):- घरगुती गॅस वापरणा-या ग्राहकांसाठी केंद्र सरकारने महत्वाची सूचना जारी केली असून गॅस जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. तेल विपणन कँपन्यांनी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंग नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. नवीन नियमानुसार, आता दोन सिलिंडर बुक करण्यामध्ये किमान २५ दिवसांचे अंतर असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे गॅसचा काळाबाजार रोखण्यास मदत होईल असा दावा केला जात आहे.

युद्धामुळे एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. यामुळे हॉटेल, कँपन्यांसाठीच्या गॅसवर बंदी आणण्यात आली आहे. तसेच घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमती देखील ६० रुपयांनी वाढल्या आहेत. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांकडून साठा करण्याची किंवा हे सिलिंडर हॉटेल व्यावसायिकांना दिले जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. यामुळे अचानक कँपन्यांनी आधीचा १५ दिवसांचा वेटिंग पिरियड आता थेट २५ दिवसांवर नेऊन ठेवला आहे.

७मार्चपासून हे नवीन नियम लागू झाले आहेत. अनेकांकडे एकापेक्षा जास्त गॅस जोडणी आहेत. दोन सिलिंडर असलेल्यांकडे एक सिलिंडर रिकामा असतो. त्या ग्राहकांनी दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. तेव्हा १५ दिवस झाल्याचा मेसेज दाखविण्यात येत होता. परंतू, १६-१७ दिवस होऊनही सिलिंडर बुक होत नव्हता. अखेर ९ मार्चला कँपन्यांनी सिलिंडर डिलिव्हरीपासून २५ दिवसांचा गॅप असल्याचा मेसेज दाखविण्यास सुरुवात केली. यामुळे एखादा ग्राहक २५ दिवसांच्या आत बुकिंग करण्याचा प्रयत्न करेल, तर त्याचे बुकिंग सिस्टिम स्वीकारणार नाही. गॅस सिलिंडर मागणीमुळे वाढलेला दबाव कमी करण्यासाठी कँपन्यांनी ही खेळी खेळल्याचे सांगितले जात आहे.

### काय आहेत महत्त्वाचे बदल ?

- २५ दिवसांचे अंतर
- एका सिलिंडरच्या डिलिव्हरीनंतर पुढचे बुकिंग करण्यासाठी २५ दिवस थांबावे लागेल.
- काळ्याबाजारावर लगाम
- घरगुती सिलिंडरचा हॉटेल किंवा इतर व्यावसायिक कामांसाठी वापर कमी होईल.
- डिलिव्हरी सिस्टिममध्ये सुधारणा
- रांगेत असलेल्या ग्राहकांना आता अधिक जलद गतीने सिलिंडर मिळणे शक्य होईल.

## पर्यावरण आणि विकास यांचा समतोल साधण्यावर राज्य शासनाचा भर

# ३०० कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य ; विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत व्यापक कार्यक्रम राबविण्यात येणार -मुख्यमंत्री

मुंबई दि.९ (प्रतिनिधी):- पर्यावरणाचे संवर्धन आणि विकास यांचा समतोल साधण्यावर राज्य शासनाचा भर आहे. राज्यात वृक्ष व वनक्षेत्राचे प्रमाण वाढवण्यासाठी मिशन मोडमध्ये ३०० कोटी (३ अब्ज) वृक्षलागवडीचा संकल्प राज्य शासनाने केला असून यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत व्यापक कार्यक्रम राबविला जाणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईतील हॉटेल सहारा येथे नानाजी देशमुख प्रतिष्ठान आणि अमेनिटी ट्री के अर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुस-या आंतरराष्ट्रीय आर्बोरीकल्चर परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी नानाजी देशमुख प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय पांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर्यन पांडे, अमेनिटी ट्री के अर फाऊंडेशनचे वैभव राजे यांच्यासह संबंधित मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील वन व वृक्षआच्छादनाचे प्रमाण वाढवण्यासाठी मिशन मोडमध्ये ३०० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येणार असून पर्यावरणीय समतोल राखत शाश्वत विकास साधणे हे राज्य शासनाचे धोरण आहे. आजच्या युगात विकास आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये संघर्ष नाही, तर दोन्ही गोष्टी एकत्रितपणे पुढे नेणे हीच काळाची गरज आहे. राज्याचा विकास आवश्यक असला तरी पर्यावरणाच्या संरक्षणाशी कोणताही तडजोड होऊ शकत नाही.

शाश्वत विकास आणि पर्यावरणीय संतुलन हेच आजचे धोरण असल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राच्या यावर्षीच्या अर्थसंकल्पात राज्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याची घोषणा करण्यात आली आहे. सध्या राज्यातील वृक्ष व वनक्षेत्राचे प्रमाण सुमारे २३ टक्के आहे. ते किमान ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी सुमारे २५० कोटी वृक्षांची आवश्यकता असून सुरक्षिततेच्या दृष्टीने ३०० कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ही वृक्षलागवड केवळ संख्येपुरती मर्यादित न राहता तिचा प्रत्यक्ष परिणाम दिसावा, यासाठी हवामान, माती, स्थानिक परिस्थिती आणि दीर्घकालीन टिकाऊपणा यांचा विचार करून संपूर्ण मोहिमेची वैज्ञानिक रचना केली जाणार आहे. पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारे तज्ज्ञ, संशोधक आणि स्टार्टअप्स यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले जाईल. लवकरच या क्षेत्रातील स्टार्ट अप्ससाठी स्वतंत्र परिषदही आयोजित करण्यात येणार आहे.

मुंबईतील विकासकामांदरम्यान पर्यावरण संवर्धनाची काळजी घेतल्या जात असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, किनारी रस्ता प्रकल्पासारख्या मोठ्या प्रकल्पांदरम्यान काही मॅन्ग्रोव्ह क्षेत्रावर परिणाम झाला असला तरी भरपाई स्वरूपात दोन मॅन्ग्रोव्ह उद्याने विकसित करण्यात आली आहेत. परिणामी, फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडियाच्या अहवालानुसार मुंबईतील मॅन्ग्रोव्ह क्षेत्र वाढण्यात यश आले आहे. आर्बोरिकल्चरच्या मदतीने वृक्षांचे आरोग्य तपासणे, त्यांचे संरक्षण करणे आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वृक्षांचे संपूर्ण जीवनचक्र नोंदवणे शक्य होत आहे. डिजिटल ट्विन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक वृक्षाची माहिती आणि देखभाल व्यवस्थापन करता येणार आहे. तसेच रस्ते प्रकल्पांमध्ये वृक्ष स्थलांतराची यशस्वीता पूर्वी ३० ते ४० टक्के होती, ती आता सुमारे ८० टक्क्यांपर्यंत वाढली असून नवीन तंत्रज्ञानामुळे ती १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न होणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

भारतीय संस्कृतीत निसर्ग आणि वृक्षांशी सुसंवाद ठेवण्याची परंपरा आहे. वेदकालीन विचारांपासून ते आयुर्वेदातील वृक्ष आयुर्वेदपर्यंत अनेक ग्रंथांत वृक्षांचे महत्त्व सांगितले आहे. मात्र, काही काळ आपण शाश्वततेचा विचार विसरलो आणि त्यातूनच हवामान बदलासारखी समस्या निर्माण झाली आहे.

परिषदेत सहभागी सर्व तज्ज्ञांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या परिषदेतून मिळालेल्या सूचनांचा शासन निश्चितच पाठपुरावा करेल आणि महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धनासाठी ठोस पावले उचलली जातील. आपले राज्य स्वच्छ, समृद्ध आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे मुख्यमंत्री म्हणाले. या दोन दिवसीय परिषदेत विविध वैज्ञानिक सत्रे, संशोधन आणि नवकल्पनांचे सादरीकरण झाले असून या क्षेत्रातील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञांनी भविष्यासाठी धोरणात्मक दिशा मांडली.

पान १ वरून

## हसावं की रडावं !

विचार करावा, हे जे मुलं बिना लग्नाचे आहेत, समाजात सुद्धा याचा परिणाम जाणवत आहे. अशी मुलं व्यसनाधीन होत आहेत.

## बाहेरच्या राज्यातून मुली आणून

**अशीच परिस्थिती आहे परंतु विधानसभेत यावर तोडगा निघतो का ? असा प्रश्न विचारला जात आहे.**

## शाळेचं गेट कोसळल्यानंतर शिक्षण विभागाला जागा

असल्यास तात्काळ दुरुस्त करुन घ्या, वर्गातील बेंच, इमारतीतील काही ठिकाणी असणारे टोकदार गज, खिळे, खांब काढून टाकावेत किंवा दुरुस्त करावेत, शाळेच्या इमारती जवळून जाणाऱ्या विद्युत तारा, ज्या विद्यार्थ्यांच्या हितास धोकादायक ठरु शकतील अशा बाबी काढून टाकाव्यात किंवा संबंधीत विभागास पत्र पाठवून त्यांच्या मदतीने काढून घ्याव्यात. ज्या खोलीमध्ये पोषण आहाराचा साठा ठेवण्यात येतो त्याच खोलीत काही ठिकाणी वर्ग देखील भरत असल्याचे शाळा भेटीत समोर आले आहे. काही ठिकाणी वर्ग भरत नाहीत परंतु इतर अडगळीचे नादुरुस्त साहित्य ठेवलेले आहे. ही वर्गखोली अतिशय अस्वच्छ असते, अंधार असतो त्यामुळे अशा ठिकाणी साप, विंचू असे घातक सजीव प्राणी निवास करु शकतात, ते आपल्या विद्यार्थ्यांना इजा पोहोचवू शकतात. त्यामुळे अशा वर्गखोल्यामधील निरुपयोगी साहित्यांचे विहित पद्धतीने निर्लेखन करुन वर्गखोली स्वच्छ करा, पोषण आहाराची साठवणूक स्वच्छ जागेवर, भरपूर हवा खेळती असेल अशा जागेत करावी अशा सूचना शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर यांनी दिल्या आहेत. सदरील पत्राच्या अनुषंगाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी याची कार्यवाही केली की नाही ? हे तपासावे आणि वार्षिक तपासणी अहवालात त्याच्या नोंदी घ्याव्यात असे देखील त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

## जि.प.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची नावे...

सुमारे ४,६०० मैल उड्डाण करेल, वाटेत अंतराळयान प्रणालींचे मूल्यांकन करेल. अंतराळातील किरणोत्सर्ग, मानवी आरोग्य आणि वर्तन आणि अंतराळ संप्रेषणांबद्दलचे आपले ज्ञान वाढविण्यासाठी आर्टेमिस II वर अनेक पेलोड उड्डाण करतील. या यांनासोबत चार अंतराळवीर चंद्राभोवती उड्डाण करतील आणि आर्टेमिस II वर परत येतील.

नासाने आयोजित केलेल्या या मोहिमेत व्हर्च्युअल गेस्ट म्हणून सहभागी होण्याबाबत नासाने आवाहन केले होते. या उपक्रमात तळवट बोरगाव जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यशस्वीरित्या विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्यानंतर नासाकडून विद्यार्थी आणि शिक्षकांचे बोर्डिंग पास पाठवण्यात आले. त्यांना मोहिमेचे प्रक्षेपण व्हर्चुअली पाहता येणार आहे. या विद्यार्थ्यांची नावे एका एसडी कार्डमध्ये संग्रहित करून ओरियन यानाद्वारे चंद्राकडे पाठवली जाणार आहेत. यामध्ये इयत्ता पहिलीतील ८, इयत्ता दुसरीतील १०, इयत्ता तिसरीतील १५ आणि इयत्ता चौथीतील १६ अशा एकूण ४९ विद्यार्थ्यांसह शाळेतील मुख्याध्यापक व २ शिक्षक यांच्या नावाचा यात समावेश आहे.

या उपक्रमामागे शाळेतील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांची आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सतत नाविन्याचा ध्यास घेऊन विद्यार्थी विकासासाठी विविध उपक्रमांचे प्रभावी आयोजन करून विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास याबरोबरच शालेय शिक्षणासोबतच विज्ञान-तंत्रज्ञान विश्वातील घडामोडींची शाळेतील विद्यार्थ्यांना परिचय करून देत वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध करण्यासाठीची उपक्रमशीलता दिसून येते. या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षिका राधिका अंबिलवादे तसेच गोरे सर यांनी देखील या उपक्रमात सहभाग घेतला.


## एन एस एल शुगर्स लि. युनिट ३ जय महेश पवारवाडी, ता. माजलगाव, जि. बीड

### गाळप हंगाम बंद जाहीर निवेदन

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की, कारखान्याचा चालू गाळप हंगाम सन २०२५-२०२६ साठी जवळपास नोंदलेल्या सर्व उसाचे गाळप पूर्ण होत असल्याने कारखान्याचा चालू गाळप हंगाम १५ मार्च २०२६ रोजी बंद होणार आहे. ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा चालू गाळप हंगाम २०२५-२०२६ साठी नोंदवलेला ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिलेला असेल अशा सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखाना मुख्य कार्यालय अथवा संबंधित विभागातील शेतकी कार्यालयाकडे संपर्क साधून पूर्व परवानगीने सदरचा ऊस स्वतः तोड वाहतूक करून गळीतास पाठवून द्यावा. तसेच ज्यांच्या ऊसाची नापीक, रस्ता अडचण अथवा इतर कारणामुळे ऊसाची तोड होऊ शकली नाही आशा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सदरच्या ऊसाचे स्वतः तोड व वाहतूक करून सदरचा ऊस कारखाना बंद होण्यापूर्वी कारखान्याकडे गाळपासाठी पाठवून द्यावा. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून देखील ज्या ऊस उत्पादकांचा ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिल्यास शिल्लक ऊसाची कसलीही जबाबदारी कारखाना प्रशासनावर राहणार नाही याची कृपया संबंधित ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी ही नम्र विनंती.

गाळप हंगाम २०२५-२०२६ यशस्वी करण्यामध्ये मोलाचे योगदान देणारे सर्व उत्पादक शेतकरी, अधिकारी, कर्मचारी, ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदार, मजूर आणि हितचिंतक या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि हार्दिक आभार.

दि.९ मार्च २०२६

**नारायण मूर्ती**, युनिट हेड — **पारसनाथ जैस्वाल**, जनरल मॅनेजर

**एन एस एल शुगर्स ली युनिट ३, जय महेश पवारवाडी**


## अंधारात पिणाऱ्यांनो, आता पोलिसांचे रट्टे

यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे.

''प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतरही जर तीच व्यक्ती पुन्हा सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करताना आढळली, तर तिच्यावर प्रचलित कायद्यानुसार कडक गुन्हा दाखल केला जाईल.''

## पत्र्याच्या शेडमध्ये गुटख्याचा साठा....

मिळाली. त्यानुसार एलसीबीच्या टीमने सदर ठिकाणी छापा टाकला असता शेख इरफान जब्बार (रा.जुनी भाजी मंडई, बुंदेलपुरा बीड) हा त्याच्या आर्थिक फायद्यासाठी सलमान रफीक बागवान (रा.बशीरगंज बीड) याच्या सांगण्यावरुन पत्र्याच्या शेडमध्ये पांढऱ्या रंगाच्या गोण्यामध्ये विविध कंपनीचा १ लाख ६० हजार २४० रुपयांचा गुटखा साठवून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी शेख इरफान याला अटक केली असून सलमान रफीक बागवान हा फरार झाला आहे. दोन्ही आरोपीं विरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांच्यासह पो.ह.गोविंद राख, युनूस बागवान, अंकुश वरपे, महिला पोलीस स्वाती मुंडे, पो.अं.अशफाक सय्यद, मनोज परजने, बबन सलगर, चालक नितीन वडमारे यांनी केली.

## वारंवार कारवाई करुनही गुटखा येतो कुठून

**हा गुटखा येतो कुठून ? याच्या मुळाशी मात्र पोलीस जाण्याचा प्रयत्न का करत नाहीत ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार कारवाई करुन आणि लाखो रुपयांचा गुटखा जप्त करुनही गुटखा माफिया सर्रास पुन्हा आपला माल मार्केटमध्ये कसा आणतात ? पोलिसांनी याची पाळेमुळे खोदून काढली पाहिजेत.**

## सीईटी निकालानंतरच केंद्रप्रमुख पदोन्नती

अमरण उपोषण सुरू केले आहे.

बीड जिल्हा परिषदेसमोर शिक्षक संघटनांनी आजपासून अमरण उपोषण सुरू केले आहे. नियमानुसार केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबवण्यात येत नसुन प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना आणि सीटीईटी परिक्षेचा निकाल लागलेला नसतांना ही प्रक्रिया राबवण्याचा घाट शिक्षण विभागाने घातला आहे. टीईटी पेपर १ व २ ची संदीग्धता दुर होईपर्यंत केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया थांबवावी, २६ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षण विभागाने प्रसिध्द केलेल्या यादीत अनेक त्रुटी आणि चुका आहेत त्यामुळे सदर यादी तात्काळ रद्द करावी, ज्या शिक्षकांनी आक्षेप नोंदवले आहेत त्यांची सुनावणी घ्यावी अशी मागणी शिक्षक संघटनांनी प्रशासनाकडे केली आहे.

## आरटीई प्रवोशातील१ कि.मी.अटीला....

प्रवेशासाठीच्या १ किलोमीटर अंतराच्या अटीला स्थगिती दिली आहे.

राज्य सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेश घ्यायचा असल्यास विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरातील शाळाच निवडण्याची अट घालण्यात आली होती. मात्र या निर्णयाला नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमधून आव्हान देण्यात आले होते. या याचिकांवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना म्हटले की, आरटीई कायद्यात कुठेही १ किलोमीटरची अट नमूद केलेली नाही. शिक्षणाचा हक्क कायदा हा केंद्र सरकारचा असून त्यामध्ये राज्य सरकारने अशी अट लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देणे आणि दुसऱ्या हाताने तो काढून घेण्यासारखे असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. याचिकेत १ किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पालकांना आपल्या मुलांसाठी आरटीई अंतर्गत कोणतीही शाळा निवडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


### जाहिर प्रगटन

मी **रविंद्र किसनराव नागरगोजे** (वय-५९ वर्षे) व इतर कळविण्यात येते की, आम जनतेस सुचित करण्यात येते की, मी मौजे तळेगांव गट क्रं.११८ मध्ये लिहुन देणार रागिनी संतोष मोटे, संतोष मधुकर मोटे, संदिप गंगाधर आदमाने, सारिका संदिप आदमाने, यांच्या नावे असलेले एकुण क्षेत्र ०.४० आर जमीन जिची चतुःसिमा पुर्वेस-निवृत्ती खंडु घोलप, पश्चिमेस -नवले यांची जमीन, दक्षिणेस-नाला-बंधारा, उत्तरेस- नंबरबांध गाडी रस्ता यामधील झाड-झुडुप खरेदी करण्याचा ठराव झालेला आहे. तरी कोणाचा काही वादविवाद असल्यास मला सादर करावा आक्षेप असेल तरी प्रत्यक्ष कळवावे

- आपला जाहिर प्रगटन देणार -

**रविंद्र किसनराव नागरगोजे**

मो. ९३७३४३३४३४


## महिला आयोगाला निधीची कमतरता भासू दणार नाही-बोर्डीकर

मुंबई दि.९ (प्रतिनिधी):- राज्य महिला आयोगाच्या मागणीनुसार शासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. आयोगाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विधानसभेत सांगितले. आयोगास मागणीनुसार दरवर्षी निधी वाढवून दिला जात असून यावर्षी १८ कोटी ३५ लाखांची तरतूद करण्यात येत असल्याची माहिती श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी दिली.सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला.राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकरिता एकूण ३५ पदे मंजूर असून त्यापैकी नियमित १८ आणि बाह्ययंत्रणेद्वारे १७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पान ६ वरून

## नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती

सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येईल, असे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे.याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत राज्यभरात सरसकट १४ लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य शासनाने योग्य पद्धतीने हाताळण्याचा सल्ला केंद्र शासनाने दिला आहे. राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक त्या धोरणात्मक निर्णयांवर विचार करणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगितले.

## पार्वतीबाई भुते यांचे निधन

शहरासह तालुक्यातील समाज बांधव, हितचिंतक व प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. भुते कुटुंबियांच्या दुःखात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## विनयभंग व बाललैगिंक अत्याचार केल्याच्या आरोपातुन

प्रभावी युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीची दि.०६/०३/२०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणी आरोपीचे वतीने अ‍ॅड. उद्धव दुर्गादासराव मोरे (कारीकर) यांनी काम पाहिले.

## यशवंत उद्यानात केलेल्या वृक्षारोपणातील झाडे अज्ञात समाजकंटकाने उपटून टाकली

उद्यान अर्थात हे चमन या नावाने सुप्रसिद्ध आहे. येथे कही दिवसापूर्वी येथील वृक्षप्रेमी यांनी जवळ पास १०००-१५०० झाडाचे वृक्षारोपण केले, रोज त्याला पाणी देखील दिले जात होते, पण रात्रीच्या वेळी वृक्षदुश्मन म्हणा किंवा विध्वंसक यांनी हे पूर्ण वृक्षाची नासधूस केली व जमीनीतील वृक्ष फेकून दिले, हे किती दुर्दैव म्हणावे लागेल, यामुळे आम्ही वृक्षप्रेमी आशा विध्वंसक लोकांचा निषेध करत असल्याचे नमूद करून कोणाला चांगले करता येत नसेल तर करू नका परंतु वाईट करण्याची मनोरुग्नता करू नका असे आवाहन या निमित्ताने एका वृक्ष प्रेमिने पार्श्वभूमीला पाठविलेल्या पत्रकात नमूद केले. तसेच या प्रकाराची सखोल चौकशी करून यात कोणी दोषी असतील त्याच्यावर कठोर कारवाई करावी नव्हे तर वृक्षारोपणासाठी झालेला खर्च संगोपनासाठी वापरण्यात आलेले मनुष्यबळ याची आर्थिक गोळा बेरीज करून सदरचा खर्च नगरपालिकेने वसूल करावा अशी मागणी देखील केली. दरम्यान या नासधूशी संदर्भात नगरपालिकेकडे तक्रार देखील करण्यात आल्याचे सांगण्यात येते आता नगरपालिका यासंदर्भात काय कारवाई करते याकडे वृक्ष प्रेमींचे लक्ष लागले आहे.

## मदनलाल सारडा राजस्थानी प्रा.विद्यालयात

खो खो या खेळांचा समावेश होता. या खेळांमध्ये प्रथम द्वितीय तृतीय उत्तेजनार्थ असे बक्षीस देण्यात आले यामध्ये विद्यार्थ्यांना मेडल व प्रशस्तीपत्र देण्यात आले. या खेळांचे सुंदर असे नियोजन क्रीडा प्रमुख वैभव बियानी सर , मुळे सर व मोराळे मॅडम यांनी केले होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांनी केले. प्रस्ताविकात सांगताना सर म्हणाले भविष्यातील खेळाडू घडावेत म्हणून शाळा वेळोवेळी नवनवीन उपक्रम शाळेमध्ये घेत असते.त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री तापडिया साहेब व बाहेती साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन यावेळी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वैभव बियाणी सर यांनी केले तर आभार मुळे सर यांनी मानले.कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बीडमध्ये ईद बाजार गजबजणार

क्रमांक ८४८२९८०७५५ , ९८५०८३९३५०,९९२११७६०३३, ९३२५७१०४४३ या क्रमांकवार संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे ईदचा हा उत्सव बीडकरांसाठी अविस्मरणीय होणार असून लवकरच हा ईद बाजार गजबजणार आहे.

## स्वंय प्रेरणा मनातील इच्छा शक्ती व दृढनिश्चय ध्येय साध्य करताना उपयोगी पडते

देण्यास सक्षम झाल्याचे विशद केले. तसेच स्वंय प्रेरणा मनातील इच्छा शक्ती व दृढनिश्चय ध्येय साध्य करताना उपयोगी पडते . विविध क्षेत्रातील सर्व महिलाचे कार्य समाजास प्रेरणादायी आहे.हा सोहळा अतिशय उत्साहाच्या वातावरणात व शेकडो महिला व बंधुच्या उपस्थितीत पार पडला आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष श्री. महेश मोटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पं .दीनदयाल शोध संस्थान सर्व पदाधिकारी, व इतिहास संकलन संस्था समिती बीड जिल्हा अध्यक्ष जयंत अकोलकर, सचिव श्रीकृष्ण जोशी सह सचिव श्री सुनिल मोगरकर, संघटन सचिव श्री मुकुंद कुलकर्णी, प्रा- शशिकांत पसारकर देवगिरी प्रांत कोषाध्यक्ष, प्रा सुहास जोशी संजय डोळे महेश मोटे सौ. कविता जोशी, सौ वर्षाताई पसारकर,श्री. प्रमोद कुलकर्णी सर्व जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## बीडमधुन तरूण बेपत्ता

शिवाजी नगर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. उंची ५ फुट ७ इंच, रंग गोरा, अंगात काळ्या रंगाचा टि-शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट, पायात चप्पल, केस काळे अशा वर्णनाच्या सोबतच्या छायाचित्रातील व्यक्ती विषयी माहिती मिळाल्यास संपर्क करावा, असे आवाहन कुटूंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आ.भारतीय यांनी पत्रकार व विक्रेत्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले

मात्र कोरोना काळानंतर वृत्तपत्रांच्या खपात जवळपास ५० टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. त्यामुळे या क्षेत्राशी संबंधित पत्रकार, कर्मचारी आणि वृत्तपत्र विक्रेते यांच्यासमोर आर्थिक आणि व्यावसायिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. लोकशाहीतील वृत्तपत्र व्यवस्था टिकण्यासाठी वाढण्यासाठी सरकारने जबाबदारी घेणे आवश्यक आहे. समाजात सगळेच बॅक टू बेसिक या भूमिकेत आलो असल्याने वृत्तपत्रांच्या बाबतीमध्ये सरकारने सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक आहे. १० ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य सरकारने पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती. मात्र ते अद्याप कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे हे महामंडळ नेमके कधी सुरू होणार आणि पत्रकार-विक्रेत्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांवर सरकार कधी निर्णय घेणार, असा थेट सवाल भारतीय यांनी उपस्थित केला.राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सरकारकडे विविध मागण्यांसाठी पाठपुरावा केला असल्याचा उल्लेख भारतीय यांनी केला.भारती यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले, आमदार भारतीय यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाला हात घातला आहे. समाजातील घटना लोकांपर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची असून लोकशाही व्यवस्थेत माध्यमांना चौथा स्तंभ म्हणून मान्यता आहे.

कोरोना महामारीनंतर या क्षेत्रात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती सरकार मान्य करते. त्यामुळे पत्रकार आणि विक्रेत्यांसाठी जाहीर केलेली महामंडळे पुढील अधिवेशनापूर्वी कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.तसेच पत्रकार संघटना, संबंधित विभागांचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत स्वतंत्र बैठक घेऊन प्रलंबित मागण्यांवर चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले. या चर्चेत आमदार संजय खोडके आणि सतेज पाटील यांनीही सहभाग घेत पत्रकार आणि विक्रेत्यांच्या अडचणींबाबत आपली मते मांडली.विधान परिषद उपसभापती निलम गोऱ्हे यांनीही चर्चेत हस्तक्षेप करत पत्रकारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सरकारने अधिक संवेदनशीलतेने विचार करावा, अशी सूचना केली. विशेषतः बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेतील वयोमर्यादा आणि सलग सेवेसंबंधीच्या अटींचा पुनर्विचार करून अधिकाधिक पत्रकारांना त्याचा लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र उपसमिती स्थापन करण्याचा विचार करावा, असे त्यांनी सुचविले. दरम्यान, पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नांवर सभागृहात ठामपणे आवाज उठवल्याबद्दल आमदार श्रीकांत भारतीय यांच्या पुढाकाराचे माध्यम क्षेत्रातून स्वागत करण्यात येत आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे हा प्रश्न विधिमंडळाच्या पातळीवर चर्चेला आला आणि सरकारकडून सकारात्मक भूमिका जाहीर करण्यात आली.सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार पत्रकार आणि विक्रेत्यांसाठीची महामंडळे कार्यान्वित झाली आणि प्रलंबित मागण्यांवर निर्णय झाले, तर राज्यातील माध्यम क्षेत्राशी संबंधित हजारो घटकांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे श्रीकांत भारतीय यांचे पत्रकार संघटनांकडून अभिनंदन केले जात आहे.आमदार श्रीकांत भारतीय यांनी वृत्तपत्र पत्रकार यांच्या प्रश्नावर यदु जोशी व वसंत मुंडे यांनी पाठपुरावा केल्याचा उल्लेख केला.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी दीक्षाभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई अशी सहा हजार किलोमीटर ची पत्रकार संवाद यात्रा काढून वृत्तपत्र काम करणारे पत्रकार आणि विक्रेते यांच्या समस्या वर आवाज उठवत सरकार समोर प्रश्न मांडले होते. ऐतिहासिक यात्रेमुळे सर्वसामान्यांचा आवाज असणाऱ्या माध्यम घटकाचे प्रश्न ऐरणीवर आले होते. त्यातून सरकारने पत्रकार व विक्रेत्यांसाठी महामंडळाची घोषणा केली होती. याचा सभागृहात आमदार श्रीकांत भारतीय यांनी विशेष उल्लेख केला.

## घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच जमा होणार

घरकुलासाठी ५ ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आतापर्यंत दीड लाख लोकांनी याचा लाभ घेतला आहे. ज्यांना अद्याप वाळू मिळाली नाही, त्यांना ती उपलब्ध करून दिली जाईल, मात्र वाळूऐवजी रोख रक्कम देणे शक्य नाही. भूमिहीन लाभार्थी ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, अशा लाभार्थ्यांना शासन जमीन उपलब्ध करून देईल किंवा जमीन खरेदीसाठी अर्थसाह्य करेल. प्रलंबित प्रस्तावांबाबत माहिती दिल्यास त्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल. मनरेगा कर्मचाऱ्यांच्या संपामुळे किंवा तांत्रिक कारणांमुळे रखडलेली मनरेगाची मजुरी लाभार्थ्यांना लवकर मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असेही श्री गोरे यांनी सांगितले. प्रश्नाच्या चर्चेत बिधनसभा सदस्य श्वेता महाले,राजेश पवार,सत्यजीत देशमुख यांनी प्रश्नाच्या चर्चेत सहभाग घेतला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## अक्षरा शेलार महिला मॅरेथॉनमध्ये तृतीय

बीड दि ९ (प्रतिनिधी) - जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रविवार दिनांक ८ मार्च रोजी आयोजित महिला मॅरेथॉन स्पर्धेत राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालय, येथील कु. अक्षरा शेलार हिने १० ते १८ वर्षे वयोगटात तृतीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल तिला ७ हजार रुपये रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. अक्षराच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका श्रीमती एस.डी. कदम, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे, क्रीडा प्रशिक्षक तुकाराम करांडे तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले..

## निपाणी टाकळी येथे श्री एकनाथ षष्टी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा सोहळा

बीड दि.९ प्रतिनिधी-माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी येथे श्री एकनाथ षष्टी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद्? भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा सोमवार दि. ९ मार्च २०२६ (मित्ती फाल्गुन कृ. ६, शके १९४८) रोजी प्रारंभ होणार असून सोमवार दि. १६ मार्च २०२६ (मित्ती फाल्गुन कृ. १२) रोजी सांगता होणार आहे. हा कार्यक्रम हनुमान मंदिर, निपाणी टाकळी येथे समस्त गावकरी, भजनी मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, गाथा भजन व हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## कोट्यावधी रुपये खर्चून बांधलेलं बीडचं बस स्थानक प्रवाशासाठी की मद्यपी-गुन्हेगार-भिक्षेकरी- कुत्र्यासाठी ?

बीड दि ९(प्रतिनिधी)- आधुनिक स्वरूपात बांधलेल्या बीडच्या बस स्थानक उभारनिला जवळपास दोन वर्षे लागली. अद्यापही काही अंशी काम होणे बाकी असले तरी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता हे बस स्थानक काही महिन्याखाली प्रवाशांच्या सेवेसाठी अर्पित करण्यात आले. परंतु बस स्थानकामध्ये मात्र प्रवाशांना स्वच्छता आणि सुरक्षितता मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. या बस स्थानकामध्ये दिवस-रात्र मध्यपी, गुन्हेगार, भिक्षेकरी, कुत्रे आणि जनावर यांचा सर्रास वावर होत असून कोट्यावधी रुपये खर्चून बांधलेले बीडचे बस स्थानक नेमके प्रवासासाठी ? की मद्यपी, गुन्हेगार, भिक्षेकरी, कुत्रे व जनावरासाठी ? असा सवाल प्रवासी वर्गा मधून केला जाऊ लागला आहे.
नव्याने बांधलेले बीडचे बस स्थानक अतिशय प्रशस्त वाटत असतानाच बस स्थानकाची निगा राखण्याचे काम मात्र संबंधित यंत्रणे कडून होत नसल्याचे दिसून येत आहे. या बस स्थानकावरून खेड्यावड्यासह लांब पल्ल्याच्या बस गाड्या पहाटे५.३० पासून सुटल्या जातात. त्यामुळे दुसऱ्या तालुक्यात किंवा खेडेगावात नोकरीला जाणाऱ्या महिला पुरुषांची संख्या या बस स्थानकात दिसून येते. शिवाय सकाळची गाडी पकडण्यासाठी धावपळ करणारे प्रवासी वेगळेच. बस स्थानकाच्या एका बाजूला छत्रपती संभाजी नगर महामार्गावरून जाणाऱ्या बस गाड्या थांबतात तर मांजरसूंभा महामार्गाने जाणाऱ्या बस गाड्या दुसऱ्या बाजूला थांबतात.. या गाड्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या नोकरदार याशिवाय सर्वसामान्य प्रवासी यांना मात्र यावेळी बस स्थानकात बसायला जागाच नसते. बस स्थानकातील बाकड्यावर रात्री बेसुमार ढोसून झोपलेले बेवडे दिसून येतात. तर दुसरीकडे भिक्षेकरी यांचे अंथरूणही निघालेले नसते. शिवाय चार दोन बाकड्यावर विसावलेले कुत्री वेगळेच. अशी परिस्थिती असल्याने या प्रवाशांना बाहेरच उभे राहून गाडीची प्रतीक्षा करावी लागते. दिवसभरात हेच चित्र असते. बस स्थानकात भटके कुत्री याचबरोबर भटके जनावर देखील फिरताना दिसतात. अतिशय धोकादायक बाब म्हणजे मोकट जनावराच्या शेनावरून वृध्दच काय पण धडधाकट प्रवासी देखील घसरून पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. अतिशय बेदखलपणाची बाब म्हणजे सकाळच्या वेळीच काय पण दिवसभर देखील पोलीस नसतात. यामुळे दिवसरात्र गुन्हेगारांचे वास्तव्य दिसून येते तर बस स्थानकामधून खेड्यावाड्यापासून शहरापर्यंत गाड्या जात असताना खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांच्या आरोळ्या ऐकायला मिळतात. या बस स्थानकात सिक्युरिटी गार्ड फिरताना दिसतात परंतु ते आपला धाक कसलाही दाखवीत नाहीत त्यामुळे हे सिक्युरिटी गार्डन नेमके कशासाठी नेमले ? असाच प्रश्न सर्वांना पडल्याशिवाय राहत नाही. तेव्हा बस स्थानक प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात अशी विनंती प्रवासी वर्गातून केली जात आहे.

## अखेर दिव्यांग पत्रकार नवनाथ आडे यांचा अपमान प्रकरणी गुन्हा दाखल

### बँकेमध्ये मॅनेजरने केला होता अवमान

सिरसदेवी दि ९ (प्रतिनिधी)- दिव्यांग पत्रकाराला बँकेत केवायसीसाठी मानसिक व शारीरिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला . या प्रकरणी अखेर चकलांबा पोलीस ठाण्यात दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत कलम ९२ नुसार बँक व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, पत्रकार नवनाथ आडे हे ६८ टक्के पायाने दिव्यांग असल्याने त्यांना जास्त वेळ उभे राहणे शक्य नाही. दरम्यान, दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ते आपल्या बचत खात्याचे केवायसी करण्यासाठी भारतीय स्टेट बँक, उमापूर शाखेत गेले होते. त्यावेळी त्यांच्या सोबत मदतीसाठी त्यांचे भाऊ अभय आडे व रोहित बआडे हे देखील होते. बँकेत केवायसी फॉर्म भरल्यानंतर नवनाथ आडे हे प्रथम कॅशिअरकडे गेले असता त्यांनी त्यांना शाखा व्यवस्थापकांकडे जाण्यास सांगितले. त्यानुसार ते व्यवस्थापकांच्या केबिनमध्ये गेले असता, व्यवस्थापकांनी त्यांच्यासोबत आलेल्या भावांना बाहेर जाण्यास सांगितले. त्यावेळी नवनाथ आडे यांनी आपण दिव्यांग असल्याचे सांगितले तरीही व्यवस्थापकांनी त्याकडे दुर्लक्ष करत त्यांना नीट उभे राहा, शिस्त कळत नाही का ? असे म्हणत अवमानकारक वागणूक दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. इतकेच नव्हे तर, बँकेच्या केबिनबाहेर येऊन सर्व ग्राहकांसमोर तुझ्यासारखे हजार पत्रकार आणि अपंग येतात असे म्हणत आपला सार्वजनिक अपमान करण्यात आल्याचा गंभीर आरोपही फिर्यादी नवनाथ आडे यांनी केला आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नवनाथ आडे यांनी अखेर चकलांबा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीची गंभीर दखल घेत चकलांबा पोलिसांनी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत कलम ९२ नुसार संबंधित बँक व्यवस्थापकाविरुद्ध दि. ०६ मार्च २०२६ रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे.

## भारतीय सेना दलात निवड झाल्याबद्दल संकेत गलांडे याचा ग्रामस्थांकडून सत्कार



चिंचोली (माळी) दि.९(प्रतिनिधी)- सन १९६० पासून देश सेवेत वाहून घेण्याची परंपरा केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील तरुणांनी सतत राबवली आहे. तेव्हापासून आजतागायत जवळपास दीडशेच्या वर माजी सैनिकांनी भारतीय सेनेमध्ये दाखल होऊन देशसेवा केली. यातच या गावातील येथील चि.संकेत विनायक गलांडे यांची भारतीय सेना दलात (इंडियन आर्मी) निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव जेष्ठ नेते सुनिलआबा गलांडेपाटील यांच्या हस्ते उत्साहात सत्कार करण्यात आला.
यावेळी उपसरपंच धिरज वनवे, बाळासाहेब गलांडेपाटील, माजी उपसरपंच पवन पवार, ग्रामपंचायत सदस्य सुरज गायकवाड, दगडु दळवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिलीप गायकवाड, राजाभाऊ नखाते, अमर नकाते, विजय घुमरे, तेजस गायकवाड, विराट देशमुख, गफुर शेख, अभिजीत नकाते, शंकर काळे, ओम गलांडे, कृष्णा यादव, रंजीत नकाते, अशोक गलांडे, विशाल गवळी, अशोक बाजगुडे, रविकुमार गायकवाड, वैभव बोर्डे, संदीप शितोळे, राहुल नकाते, इंद्रजीत गलांडे, सोनू गलांडे, दिगंबर मगर यांच्या सह ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील काही वर्षाखाली असे एकही सैन्य भरती नव्हती कि त्या भरतीमध्ये चिंचोली माळी येथील तरुण भरती झाला नाही. अलीकडच्या काळामध्ये सैन्य भरतीचे स्वरूप बदलले असल्याने सैन्यातील भरती होण्याची तरुणांची संख्या घटली तरी या गावाने दीडशे च्या वर माजी सैनिक दिले आहेत. भारतीय सैन्यात प्रथम दाखल होण्याचा मान बीड येथील घुमरे हॉस्पिटलचे संचालक यांच्या वडिलांचा , त्यानंतर स्व. भागवतराव चिंचोलीकर, तिसर मान सोमनाथ कळसाई. यानंतर एकामागून एक भारतीय सैन्य दलात गेले विशेष म्हणजे एका एका घरातील तिघे तिघे भारतीय सैन्य दलात होते. विशेष म्हणजे एकूण एक जाती धर्मातील तरुणांचा यात समावेश होता बऱ्याच दिवसानंतर संकेत गलांडे हा सैन्य दलात भरती झाल्याने ग्रामस्थांनी कुतूहल करत सुनील गलांडे पाटील यांच्या हस्ते त्याचा भव्य सत्कार केला.

## मांडव जाळी येथील जंगी कुस्ती स्पर्धेला मान्यवरांची उपस्थिती



बीड दि ९ (प्रतिनिधी)- इथून जवळच असलेल्या व तालुक्यातील मांडव जाळी येथील ग्रामदैवत पीर बाबा यांच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या जंगी कुस्ती स्पर्धेला शिवसेनेचे उल्हास गिराम यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवली.
या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम, नगरपरिषदेचे सभापती निजामभाई शेख, शिवसेना जिल्हा संघटक तथा देवसेना जिल्हाध्यक्ष रतन गुजर, पोलीस अधिकारी सुनील बहिरवाळ, भावी जिल्हा परिषद सदस्य देवगुडे साहेब, भावी पंचायत समिती सदस्य सपकाळ साहेब, पहिलवान युवा नेते बबन भैया बहिरवाळ, शिवसेना उपशहर प्रमुख हनुमान बहिरवाळ, गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान गुजर, बाजीराव नही राळे सर, बाळासाहेब आवारी (आबा) यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच वस्ताद तिरमक दादा बहिरवाळ, बळीराम वस्ताद, दत्ता बहिरवाळ वस्ताद, राम बहिरवाळ पैलवान, वसंत भांडणे पैलवान, युवा नेते शरद बहिरवाळ, कृषी सहाय्यक सुनील बहिरवाळ यांच्यासह गावातील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## जैन मंदिराच्या पाठीमागील छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस प्रारंभ

बीड दि.९ प्रतिनिधी-बीड शहरातील गयानगर जालना रोड जैन मंदिराच्या पाठीमागे छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस दि.०६/३/२०२६ शुक्रवार पासून प्रारंभ झाला आहे. या कथेची सांगता दि.१२/३/२०२६ गुरूवार रोजी होणार आहे. शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शिवाजी महाराज पवार ( मांजरसुबा ) हे कथेचे निरुपण करत आहेत.
ज्ञानयज्ञ सोहळा संपन्न होत आहे. कथा वेळ दररोज दुपारी ०२ ते सायं.०५ वाजेपर्यंत होत आहे. दि.१२/०३/२०२६ शुक्रवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल.

## महिला दिनानिमित्त सत्कार झाल्याने गुणवंत महिला खेळाडूमध्ये आनंद

बीड दि ९(प्रतिनिधी)- क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा क्रिडा संकुल येथे रविवार दि,८ रोजी जिल्ह्यातील गुणवंत राष्ट्रीय खेळाडू व महिला प्रशिक्षकांचा सन्मान करण्यात आल्याने या महिलांनी आनंद व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. याबाबत माहितीचा सिटी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रा. जे .पी . शेळके , तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, ज्येष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात , जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , जिल्हा रग्बी संघटनेचे सचिव नितीन येळवे , राष्ट्रीय रग्बी प्रशिक्षक शोयब खाटीक , जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त क्रीडा संघटक शरद अंदुरे, जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त महिला तायक्वांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधा तांबे , क्रीडा मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार , अविनाश पाटील, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या सत्कार सोळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीस जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी या षटकारांमधील पार्श्वभूमी आपल्या प्रास्तविकातून विशद केली . डॉ. अविनाश बारगजे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल सर्व महिला खेळाडूचे कौतुक केले. प्रा.जे पी शेळके यांनी अध्यक्षीय समारोप केला यावेळी गुणवंत क्रीडा कार्यकर्ता जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेत्या तायक्वांदो प्रशिक्षिका जया बारगजे, योग प्रशिक्षिका राधिका तांबे व राष्ट्रीय पातळीवरील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तायक्वांदो खेळाची आंतरराष्ट्रीय खेळाडू नयन बारगजे , राष्ट्रीय पदक विजेती तायक्वांदो खेळाडू कार्तिकी मिसाळ , यशश्री चव्हाण , राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू रत्नमाला चौरे , आकांक्षा खरब , राष्ट्रीय रग्बी खेळाडू आदिती लोंढे, कीर्ती जाधव व राधा दिवे या गुणवंत महिला खेळाडूंचा प्रातिनिधिक स्वरूपामध्ये सन्मानचिन्ह व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तेव्हा हा सत्कार झाल्याबद्दल क्रीडा क्षेत्रातील महिला व खेळाडूंनी आनंद व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

## शितलताई लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत जानेगाव येथे जागतिक महिला दिन साजरा



केज दि ९ (प्रतिनिधी)-तालुक्यातील जानेगाव येथील हनुमान मंदिर मध्ये येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी महिला तालुकाध्यक्ष शितलताई लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी माता क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. गावातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवर महिलांनी आपले विचार मांडले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा चटप व शुभांगी कांबळे यांनी केले . कार्यक्रमाच्या अध्यक्षा शितलताई लांडगे यांनी महिलांना संबोधित करताना आजच्या युगात महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपले अस्तित्व तयार करावे, आपली नवीन ओळख निर्माण करावी स्वतःआर्थिक, सामाजिक, शारीरिक आणि शैक्षणिक रित्या सक्षम व्हावे महिला सक्षमी करणासाठी येडेश्वरी फाउंडेशन आपल्या सदैव पाठीशी आहे असा शब्द दिला . यावेळी सीआरपी सोनिया चटप मॅडम, उमेदच्या सीआरपी कांबळे मॅडम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्या सिंधुताई पारवे, उमा मॅडम, मायाताई कसबे रागिनीताई वाघमारे व गावातील मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.

## हैदराबाद येथे ''माईसाहेब डॉ.सविता भीमराव आंबेडकर'' चित्रपटास मिळाला विशेष पुरस्कार




छत्रपती संभाजीनगर दि ९ (प्रतिनिधी)- येथील अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित ''माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर'' या चित्रपटाला हैदराबाद येथे संपन्न झालेल्या १० व्या इंडियन वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये ऑनरेबल ज्यूरी मेंशन हा विशेष पुरस्कार मिळाला आहे.
देश-विदेशातील अनेक चित्रपटांनी या महोत्सवात सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये ''माईसाहेब'' या चित्रपटाला विशेष गौरव मिळाला.
प्रकाश त्रिभुवन दिग्दर्शित व निर्मित हा चरित्रपट डॉ. सविता भीमराव आंबेडकर (माईसाहेब) यांच्या जीवनकार्यावर आधारित असून त्यांच्या सामाजिक योगदानाचा सखोल वेध घेतो. या चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक आदित्य कुमार आहेत. या चित्रपटाला यापूर्वीही अनेक मानाचे सन्मान प्राप्त झाले आहेत. कान्स वर्ल्ड फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट हा पुरस्कार, अंबरनाथ इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट वेशभूषा पुरस्कार (छाया त्रिभुवन) तसेच इतर महोत्सवांमध्येही चित्रपटाचा गौरव करण्यात आला आहे.

## वैष्णवी महाविद्यालयामध्ये महिला दिन साजरा

वडवणी दि ९ प्रतिनिधी) -येथील वैष्णवी महाविद्यालयामध्ये मध्ये कार्यरत असणाऱ्या विशाखा समिती अंतर्गत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दत्ता सरवदे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. परमेश्वर शेंडगे होती. प्रमुख वक्त्यांनी आपल्या व्याख्याना मध्ये स्त्री ही दिवसेंदिवस दिवस कशी प्रगती करत आहे, व आजची स्त्री ही फक्त चूल आणि मूल सांभाळत राहीलेली नाही तर ती सर्व क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवित आहे, हे सांगत असताना त्यांनी अनेक उदाहरणे दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय खोसे यांनी तर प्रस्ताविक महाविद्यालयातील विशाखा समितीचे अध्यक्षा प्रा.डॉ. रेखा चौधरी मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनी साने गुरुजी निवासी विद्यालयातील मुलींना एचपीव्ही लसीकरण



केज दि ९ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रात एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली. त्याच दिवशी केज जिल्हा उप रुग्णालयाच्या वतीने साने गुरुजी निवासी विद्यालय येथील १४ वर्ष पूर्ण केलेल्या व पंधरा वर्षे पूर्ण न केलेल्या मुलींना लस देण्यात आली.
सदर एचपीव्ही लस म्हणजे ह्युमन पॉपिलोमा व्हायरस या विषाणूमुळे प्रजनन मार्गातील एक सामान्य संसर्ग होतो. गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या बहुतांश रुग्णांमध्ये एचपीव्ही जबाबदार असतो. हा कर्करोग भारतीय महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगां पैकी दुसऱ्या क्रमांकाचा कर्करोग आहे या लसी मुळे गर्भाशय मुखाचा कर्करोग कमी होण्यास मदत होणार आहे. दि.८ मार्च रोजी उपजिल्हा रुग्णालय केज येथे साने गुरुजी निवासी विद्यालयातील १३ मुलींना लसीकरण करून मोहिमेचा शुभारंभकरण्यात आला. यावेळी लसीकरणासाठी उप जिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे, डॉ. इंगोले, संकुलाच्या प्राचार्य डॉ. कविता गीते - कराड मॅडम उपस्थित हे होते. तसेच या मोहिमेत सहभागी रुग्णालयाच्या डॉ. केशव इंगोले, डॉ. संजय पुसदेकर, डॉ. कृष्णा म्हात्रे, श्रीमती आशा पौळ, तळेकर, महाजन विजय, नर्स व ब्रदर्स यांनी लस देण्याचे काम यशस्वी रित्या पूर्ण केले.

## सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी श्री संघाच्या विश्वस्तांकडून सन्मानित



जामखेड दि ९(प्रतिनिधी)- येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या अविरतपणे करीत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांचा आकुर्डी निगडी प्राधिकरण जैन श्रावक संघाच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने जामखेड नगरीत शाल माल्यार्पण व पुष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जैन श्रावक संघाचे पूर्वाध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक सुभाष ललवाणी यांनी जामखेडला कोठारी प्रतिष्ठानच्या ऑफिसला येऊन सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या समाजसेवेची दखल घेऊन गेली तीस-पस्तीस वर्षापासून सातत्याने चालू असलेल्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करत असताना अपघातातील हजारो लोकांचे प्राण वाचवले त्याबद्दल आकुर्डी निगडी प्राधिकरण जैन श्रावक संघाचे अध्यक्ष विजय गांधी, कोषाध्यक्ष नेमसुख मांडोत विश्वस्त दिलीप फिरोदिया सदस्य सुरेश जैन आदींनी येऊन यथोचित सत्कार केला व पुढील कार्यास सुयश चिंतीले.

## प्रा.गायकवाड लिखीत निखाऱ्यातील अग्निफुले व माय ग्रंथांचे प्रकाशन

अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी) -येथील प्रवर्तनवादी चळवळीत सक्रिय असलेले प्रख्यात साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड लिखीत निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. स्मृतिशेष सागराबाई केरबा गायकवाड यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त प्रा.गौतम गायकवाड लिखीत निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे प्रकाशन प्रा.डॉ.धम्मपाल रेवण माशाळकर (जेष्ठ साहित्यिक, सोलापूर) यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, भाषाप्रभू आणि गांधी भक्त तथा श्रध्देय बाबा आमटे यांचे मानसपुत्र प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम जोगदंड यांनी केले तर उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.ईडगार, प्रा.डॉ.साहेबराव गाठाळ, विश्वंभर वराट गुरूजी, विद्याधर पांडे, प्राचार्य डॉ.दिपक फुलारी, उपप्राचार्य बिभीषण फड, संतराम कराड, प्रा.नागनाथराव जल्दे आदींसह अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिलीप गायकवाड, आर.जी.गायकवाड, जगन सरवदे, राजेंद्र घोडके, चंद्रकांत बनसोडे, सुभाष ताटे, आकाश वेडे, राजू वाघमारे आदींसह मित्र परिवार व गायकवाड कुटुंबियांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

## पवन जोगदंड व बुद्धभूषण ताजणे यांची कराटे युनिव्हर्सिटी राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवड

बीड दि ९ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेर रायगड विद्यापीठ यांच्या अंतर्गत श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय धुळे येथे २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान कराटे युनिव्हर्सिटी राष्ट्रीय स्पर्धेकरिता झालेल्या निवड चाचणीमध्ये पवन बालाजी जोगदंड याने-७५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला तर बुद्धभूषण संजय ताजने याने काता या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळून राष्ट्रीय स्पर्धा आपले स्थान निश्चित केले आहे
भोपाळ या ठिकाणी १७ ते २० मार्च यादरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता पवन बालाजी जोगदंड तसेच बुद्धभूषण ताजणे या दोन्ही खेळाडूने आपले स्थान निश्चित केले आहे वरील खेळाडू सेन्साई उत्तरेश्वर जगन्नाथ सपाटे यांच्या मार्गदर्श लाभले बीड जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी पवन जोगदंड यांनी नितीनियम सराव करत आहे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर तसे , रेवनाथ शेलार सर , अनिकेत काळे सर, पाटील सर , कालिदास हसुरकर सर , जितू सर, सतीश राठोड सर, योगेश करंडे सर , मोसिन शेख , जालिंदर इंगळे वरील माननीय वराने खेळाडूंचे अभिनंदन केले व भोपाळ या ठिकाणी होणारे राष्ट्रीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय

## माणुसकीच्या निष्पापांसंगे युद्ध आमुचे सुरू...

जगभर काही माथेफिरू राष्ट्रप्रमुखांच्या सत्तेच्या हव्यासापोटी युद्धज्वर बळावत आहे आणि जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलंय. मोठ्या प्रमाणात वाढणारी बेरोजगारी, महागाई, सत्तेविरोधातील वाढता असंतोष यावरून लक्ष हटवण्याकरिता युद्धाचा वापर केला जातो. किती विदारक परिस्थिती असेल अशा युद्धग्रस्त मुलांसमोर. जिथे जिवंत राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो. उद्याचा सूर्योदय पाहता येईल की नाही याची कोणतीही शाश्वती देता येत नाही. कारण त्यांच्या आकाशात पक्षांऐवजी फायटर जेट्सच्या किंकाळ्या घुमतात. रात्रभर जणू ड्रोन्सची घुबडं त्यांच्या इमारतींच्या बाहेर घुत्कार करतात. ज्यांच्या श्वासात बारूद मिश्रित हवा मिसळली जातेय. ज्यांची पाटी केव्हाच फुटलीये. त्यांच्या वर्गात आता खडूंऐवजी काडतुसं सापडताहेत. होय! गेल्या आठवड्यातच अमेरिका आणि इस्रायलनं इराणवर हल्ला केला आणि मध्यपूर्व आशियावरती युद्धाचे ढग दाटून आले. पहिल्याच दिवशी इराणमधील प्रमुख धर्मांध नेता आयतुल्लाह खामेनी आणि इतर ४८ जणांना यमसदनी पाठवल्याची माहिती खुद्द अमेरिकेचे राष्ट्रप्रमुख डोनाल्ड ट्रम्प यांनी माध्यमांना दिली. परंतु याने युद्धविराम मिळाला का? उलट इराण आणखी त्वेषानं अमेरिका व इस्रायलचा प्रतिकार करू लागला. जॉर्डन, कुवेत, ओमान, कतार दुबई, सौदी अरेबिया हे देशही युद्ध कचाट्यात सापडले आहेत. कारण अमेरिकेचे संरक्षण तळ, त्यांची साधनसामग्री या देशांमध्ये आपत्कालीन स्थिती हाताळण्याकरिता तैनात केलेली होती. परंतु सुक्याबरोबर ओलंही जळतं असं म्हणतात, त्याप्रमाणेच या युद्धाची झळ फक्त मध्यपूर्व आशियातील देशांनाच नव्हे, तर ती जगभर बसणार आहे आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होणार आहेत.एकूणच जगभर काही माथेफिरू राष्ट्रप्रमुखांच्या सत्तेच्या हव्यासापोटी युद्धज्वर वाढत आहे आणि जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलंय. पण इतिहासात डोकावल्यावर लक्षात येतं की, मोठ्या प्रमाणात वाढणारी बेरोजगारी, महागाई, सत्तेविरोधातील वाढता असंतोष यावरून लक्ष हटवण्याकरिता युद्धाचा आणि धर्माचा अस्त्र म्हणून वापर केला जातो. सध्या ट्रम्प आणि इस्रायलचे राष्ट्रप्रमुख बेंजामिन नेतन्याहू यांच्या विरोधात त्यांच्याच देशात असंतोषाचं वातावरण आहे. अनेक भ्रष्टाचाराचे आरोप या नेतन्याहू महोदयांवर झालेले आहेत. ट्रम्प यांचे हात एपस्टीन फाइलने बरबटलेले आहेत. अर्थात आयतुल्लाह खामेनीही धुतल्या तांदळासारखा नव्हता. १९८० च्या दशकातील छायाचित्र आणि व्हिडीओज् पाहिले तर लक्षात येतं की, त्यावेळी इराणमधील महिला, तरुणी पाश्चिमात्य कपडेही घालू शकत होत्या. मुलींना शिक्षणाचा, निर्णय घेण्याचा अधिकार होता. परंतु खामेनीच्या उदयासह इराणमधील स्त्रियांच्या समानतेचा सूर्य अस्तंगत झाला. त्याने अनेक फतवे काढले आणि स्त्रियांना बुरख्याच्या काळकोठडीत बंदिस्त केलं. इतकंच काय, तर मुलींच्या लग्नाचं वय नऊ इतकं कमी केलं. म्हणजे मासिक पाळी येण्यापूर्वीच तिला उजवून टाका, असा जणू फतवाच काढण्यात आला. स्त्रीचं मन महत्त्वाचं नसून या दमनी व्यवस्थेला उपभोगण्यासाठी फक्त तिचा देह हवा आहे हे यातून अधोरेखित होतं. तरीदेखील या खामेनीच्या मृत्यूनंतर त्याला शहादत बहाल करण्याची जणू मुस्लिम व इतर राष्ट्रांमध्ये स्पर्धाच लागली. भारतही यास अपवाद नाही. काश्मीरपासून लखनऊ अगदी कर्नाटक व मुंबईतील काही भागांमध्येही शोकसभा आयोजित करण्यात आल्या, रस्त्यांवर निदर्शनं करण्यात आली. यात भारतातील बुरखा घातलेल्या महिलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश होता. पण इराणमध्ये मात्र काही महिलांनी बुरखा जाळून मोकळा श्वास घेतल्याचे व्हिडीओ पाहण्यात आले. जगण्यात, वागण्यात किती विरोधाभास आहे ना! लोकशाही असणाऱ्या देशातील स्त्रियांनाही आपल्या स्वातंत्र्याची, अस्तित्वाची जाणीव होऊ नये इतका त्यांच्या मनावरील धर्म व्यवस्थेचा पगडा मोठा आहे. इराणच्या एका शाळेवर मिसाईल पडलं आणि १६० मुलं त्यात मारली गेल्याची बातमी ऐकून मी सुन्न झालो. त्यामुळे 'माणुसकीच्या निष्पापांसंगे युद्ध आमुचे सुरू' असंच आता खेदानं म्हणावं लागतंय. कालांतरानं युद्ध संपेल, सर्वोच्च नेते शांतता करार झाल्यावर हात मिळवतील; पण सामान्यांच्या हातातून वेळ आणि बरंच काही निसटून गेलं असेल. खरं तर हे जग काही मूठभर व्यापारी चालवतात. त्यांना पक्कं ठाऊक आहे की काय विकायचंय. कशातून नफा कमवायचा आहे. उद्यापासून जर जगभरातील सर्व युद्ध थांबली तर बंदुकांना, रायफलींना, रणगाड्यांना काही वर्षांनी गंज चढेल. त्यांच्या आतली स्प्रिंग जाम होईल. काडतुसामधल्या दारूची राख मातीत मिसळेल. हॅन्ड ग्रेनेडला पाखरं अननस समजतील. कदाचित बंकरमध्येच मुंग्याचं वारूळ तयार होईल. ड्रोन्सऐवजी फक्त रंगीबेरंगी पतंगच आकाशात मुक्तपणे उडतील. पण त्याकरिता युद्धाची नव्हे, तर जगाला बुद्धाची अत्यंत गरज आहे!

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर बीडमध्ये बुधवारी



बीड दि ९ (प्रतिनिधी)– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय राज्यमंत्री शेरसिंग डागोर महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष हे येत्या ११ मार्चला बीडमध्ये येणार असुन सफाई कर्मचार्यांच्या विविध समस्या संदर्भात जिल्हाधिकारी तसेच मुख्याधिकारी नगर पालिका बीड यांच्यासह वरिष्ठ अधिकार्यांशी चर्चा करणार आहेत.

नागपुर येथील शेरसिंग डागोर सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष हे मराठवाडा दौर्यावर असुन बीडमध्ये ११ मार्चला दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्यासह वरिष्ठ अधिकार्यांसह चतुर्थ श्रेणी कर्मचारी तसेच विविध क्षेत्रात कंत्राटी सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असणार्या कर्मचार्यांच्या विविध समस्यांसंबंधात चर्चा करणार आहेत. तसेच सकाळी ९ वाजता शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील विविध सफाई कामगारांच्या संघटनांच्या पदाधिकार्यांसोबत ते चर्चा करणार आहेत. दि.११ मार्च रोजी जिल्ह्यातील सफाई कर्मचारी संघटनेच्या पदाधिकार्यांनी शेरसिंग डागोर यांच्याशी चर्चा करण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे हजर रहावे. तसेच दुपारी पत्रकारांशी ते संवाद साधणार आहेत. जिल्ह्यातील सफाई कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीसाठी सकाळी नऊ वाजता शासकीय विश्रामगृह येथे उपस्थित राहण्याचे आवाहन विजेंद्र टाक बहुजन कामगार संघटना मराठवाडा अध्यक्ष सलग्न सफाई कर्मचारी चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघ यांनी केले आहे.

# १६ मार्चला धनगर समाजाचा आझाद मैदानावर एल्गार-वाकसे



बीड दि. ९ (प्रतिनिधी)– धनगर समाजाला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पुष्ठ क्रमांक ३६ धनगर ओरान असा समावेश केला असतानाही तत्कालीन राज्यकर्त्यांनी धनगर समाजाला जाणीवपूर्वक फसवणूक करून आरक्षणापासून वंचित ठेवले आहे त्याच भारतीय राज्यघटनेला समक्ष व अनुसरून या राज्यातील धनगर समाज आपल्या हक्काच्या एसटी अनुसूती जमातीचे आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी १६ मार्च २०२६ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर भव्य आरक्षणाचा मुक्तिसंग्राम या आधीपत्त्याखाली भव्य जनमोर्चा धनगर समाज करत असून या मोर्चाला राज्यभरातील धनगर समाज बांधवांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे. धनगर समाज मेंढपाळ व्यवसाय करून स्वतःचे जीवन जगत आहे आज परिस्थिती बघितली तर राज्यामध्ये धनगर समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण खालावले असून त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचे काम राज्यातील राज्यकर्ते हा समाज अतिशय शांतपणे व नम्रपणे आंदोलन करत आहे या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्यातील लाखोच्या संख्येने असलेला मेंढपाळ समाज व कोटीच्या घरामध्ये असलेला धनगर समाजाने बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून दिलेलं धनगर समाजाला एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी या मुख्य मागणीसाठी आणि सरकारच्या उरामध्ये धडकी भरवण्यासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे.



बीड–राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आर्ट ऑफ लिविंग संस्थेमार्फत बीड तालुक्यातील जिल्हा परिषद चऱ्हाटा प्राथमिक शाळा या ठिकाणी योग व प्राणायाम विषयी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना योग प्रशिक्षक मयुरेश गावरस्कर यावेळी उपस्थित मुख्याध्यापक सर्व शिक्षक व विद्यार्थी.

## नवगण महाविद्यालयात 'भारतीय इतिहासातील महिलांचे योगदान' विषयावर राष्ट्रीय वेबिनार

परळी वैजनाथ दि ९(प्रतिनिधी)–येथील नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने भारतीय इतिहासातील महिलांचे योगदान या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन वेबिनार उत्साहात संपन्न झाले. या वेबिनारमध्ये इतिहास क्षेत्रातील विविध पैलूंवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.या वेबिनारचे बीजभाषण प्रा. डॉ. गीतांजली बोराडे, इतिहास विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पी.बी. शिरसाट यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. झांजे बी.जे. यांनी केले. या वेबिनारसाठी तांत्रिक सहाय्य उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे, डॉ. बापू घोलप, प्रा.अजिंक्य साखरे व डॉ.मनोज प्रकाश यांनी केले आहे.या राष्ट्रीय वेबिनारमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधकांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## जि.प.प्रा.मराठी शाळेत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी)– तालुक्यातील धानोरा खुर्द येथे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील आणि अंगणवाडी तील विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्कृष्ट नृत्य सादर आपले कलागुण दाखवले होते तसेच शाळेत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेत सहभाग घेऊन बक्षीस जिंकले. या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण सोमवार रोजी करून गुणगौरव करण्यात आला.

जिल्हा परिषद मराठी शाळेत विद्यार्थ्यांनी अंगणवाडीतील चिमुकल्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात उत्कृष्ट नृत्य सादर केलेल्या आणि जानेवारी महिन्यात खेळाच्या स्पर्धा आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. प्रथम दुतीय तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सरपंच पार्वतीबाई पोळ, उपसरपंच बालासाहेब गुणाले,माजी सरपंच सुरेश जगताप, रसूल सय्यद, दिलीपराव ढगे, केशव नाना ढगे ,रज्जाक पटेल, किशन गोगावकर, श्रीराम जगताप, ओम पुरी, शब्बीर सय्यद , संदीप साबळे, गणी पठाण, मुख्याध्यापक सूर्यकांत धायगुडे, कचरू रंजवे, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका अंजुम शेख, कौशल्याबाई ढगे, अश्विनी ढगे,शांताबाई सुरवसे, अश्विनी गायसमुद्रे यांच्यासह बहुसंख्य पालक उपस्थित होते.

# युवा उद्योजक हरिभाऊ लगड यांनी शाळेला दिला संगणक व प्रिंटर

अंभोरा दि ९ (प्रतिनिधी)– आष्टी तालुक्यातील हिवरा गावचे भूमिपुत्र व पुणे येथील युवा उद्योजक हरिभाऊ लगड यांनी सामाजिक बांधिलकी जपत पिंपरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संगणक संच व प्रिंटर भेट देऊन विद्यार्थ्यांच्या संगणकीय शिक्षणाला मोठी चालना दिली आहे. आजच्या संगणकीय युगात शिक्षण क्षेत्रामध्ये संगणकाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या आधुनिक शिक्षणाचा लाभ मिळावा, ते स्पर्धेच्या युगात मागे पडू नयेत हा उद्देश मनाशी बाळगून हरिभाऊ लगड यांनी पिंपरखेड शाळेला संगणक संच व प्रिंटर भेट देत एक आदर्श उपक्रम राबविला आहे.यापूर्वीही त्यांनी या शाळेला प्रिंटर भेट दिला होता. त्यावेळी शाळेला संगणक उपलब्ध करून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. दिलेला शब्द पाळत त्यांनी संगणक संच शाळेला भेट देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाची मदत केली आहे.पिंपरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संगणक व प्रिंटरची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण घेण्यात अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात



आल्यानंतर पुणे येथे उद्योग व्यवसाय करत असलेले युवा उद्योजक मा.हरिभाऊ शिवलिंग लगड यांनी पुढाकार घेत शाळेला संगणक संच व प्रिंटर उपलब्ध करून दिला. शाळेत संगणक व प्रिंटर आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे शिक्षक व ग्रामस्थांनीही समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढे जावे, शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे व गावाचे नाव उज्ज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त करत हरिभाऊ लगड यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात मेहनत घेण्याचे आवाहन केले.याप्रसंगी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष महादेव चव्हाण, माजी ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर शंकर चव्हाण, युवा नेते सागर चव्हाण, भगवान पालवे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम,मा.कुमार घोडके प्रगतीशील शेतकरी,विनोद काळे, शाळेचे मुख्याध्यापक असलम शेख सर, पदवीधर शिक्षक अतुल चव्हाण सर व सतीश एकशिंगे सर महादेव आमले सर आदी उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाने हरिभाऊ लगड यांचे आभार मानले.

## बाळराजे पवार यांच्या वतीने आयोजित दावत ए इफ्तार कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



गेवराई दि.९ (प्रतिनिधी) :– भाजपाचे नेते बाळराजे पवार परिवाराच्या वतीने रविवार दि.८ मार्च रोजी भगवती टॉकीज परिसरात संपन्न झालेल्या दावत ए इफ्तार कार्यक्रमास हिंदू – मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेवराईचे पाटील बाळराजे पवार यांच्या परिवाराच्या वतीने दरवर्षी इफ्तार ए दावत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. रविवार दि.८ मार्च रोजी गेवराई शहरातील भगवती चित्रपट गृहाच्या परिसरात मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पवार परिवाराच्या वतीने बाळराजे पवार, शिवराज पवार यांच्यासह जगदीश पवार, ॲड.राजेंद्र राक्षसभुवनकर, ॲड.भगवान घुंबार्डे, जे.डी शहा, माजेद भाई, मुश्ताक कुरेशी, शोयब आत्तार, नगरसेवक बद्दूशेठ, शहेदादभाई, शफी आत्तार, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, भरत गायकवाड, युसूफभाई, युनुस जमादार, माऊली वादे, विठ्ठल मोटे, कृष्णा पाटोळे, नोमान फारोखी, याहाय्याखाँ पठाण, फिरोज अहमद, करण जाधव, रामनाथ दाभाडे, ब्रम्हदेव धुरंधरे, बेदरे शिनूभाऊ, बाळासाहेब सानप, राजाभाऊ आर्दड, नासेरभाई आत्तार, हामजा आत्तार, एजाज मेंबर, ॲड.अब्बासभाई, युनूसभाई, किशोर धोंडलकर, अशोक चव्हाण, सादेक चाचू , वाजेद चौधरी, सर्व नगरसेवक, माऊली सुतार, शेख अरबाज, लुकमान खान, सय्यद इम्रान, अमीर रजा, सय्यद मुद्दशीर, आखेप काझी, सलमान आत्तार तसेच हिंदू – मुस्लिम समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## भा.शि.प्र.संस्था संस्कार देणारा कारखाना -नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी



अंबाजोगाई दि ९ (प्रतिनिधी)– भारतीय शिक्षण प्रसारक संस्था केवळ शिक्षण क्षेत्रात काम करते असे नव्हे तर सामाजिक दायित्वाचं कंगण हातात ठेवून विचार परंपरेने चालणारे कुलक्षेत्र आहे. माझ्या संपुर्ण आयुष्यात संस्थेचा आदर्श आणि शिकवण नेहमीच कामी आली. महिला दिनाचे औचित्य साधून घरकाम करणार्या कष्टकरी महिलांना संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयात भेट वस्तू देवून सन्मान करण्याची परंपरा खर्या अर्थाने समाजाला आदर्श देणारी म्हणावी लागेल असे प्रतिपादन परळी शहराच्या नगराध्यक्ष सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील खोलेश्वर महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून दि.८ मार्च रविवार रोजी शहरातील श्रमिक, कष्टकरी महिलांचा सन्मान केला जातो. यावर्षी घरकाम करणार्या कष्टकरी २७५ महिलांना भेट वस्तू देवून मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम व्यासपीठावर नगरसेविका सुचिताताई देशपांडे, सौ.वर्षाताई मुंडे, पुजाताई कुलकर्णी, संगिताताई धर्माराव, सौ.अंकुश मॅडम आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.दिपक फुलारी यांनी केले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रात काम करताना सामाजिक बांधिलकी हे व्रत संस्थेचा मुळ आधार आहे. आपल्या भाषणात पुढे बोलताना नगराध्यक्षा सौ.धर्माधिकारी यांनी सांगितले की, संस्थेसोबत माझे नाते अंतरंग जन्मोजन्मीचे असून खर्या अर्थाने संस्था म्हणजे संस्कार देणारा आणि राष्ट्रभक्त घडविणारा कारखाना होय. कार्यक्रम समारोप प्रसंगी बोलताना डॉ.हेमंत वैद्य यांनी सांगितले की, संघ विचार संस्था पुढे घेवून जाताना सामाजिक दायित्व हेच संस्कार सनातन धर्मातून आमच्यावर झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सौ.वेडे यांनी केले. याप्रसंगी नगराध्यक्षा तथा मान्यवरांच्या शुभ हस्ते महिलांना भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले. उपस्थितांचे आभार प्रा. अंजली देशमुख यांनी मानले.

## वैचारिक मंचावर कुटुंबासह सामाजिक कार्याचे अभिसरण–डॉ.क्षीरसागर

बीड दि ९ (प्रतिनिधी)– बीड शहरातील भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान जवळील पिंगळे निवासस्थानी असलेल्या ओम विष्णवेनमा उपासना केंद्रात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला गौरव सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना सामान्य कुटुंबातील स्त्री आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या जोरावर समाज घडवू शकते. असे प्रतिपादन डॉ सारीकाताई क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. माधवी देशपांडे या होत्या.यावेळी बोलताना डॉ. सारिका क्षीरसागर म्हणाल्या की, सामान्य कुटुंबातील स्त्री आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या जोरावर समाज घडवू शकते. प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे कुटुंबाचा आधार असतो. महिलांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने आपले विचार मांडले पाहिजेत. बीड नगरपालिकेमध्येही आता महिला नगरसेविका आपले विषय समर्थपणे मांडताना दिसत आहेत. आपल्या विचारांसह सनातन संस्कृती मांडण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, असे त्यांनी नमूद केले.याच कार्यक्रमात श्रीमती रेशमताई विर, सौ. निलिमा पाटांगणकर, डॉ. सीमा जोशी, सौ. संध्या रावसाहेब पाठक, मंगला भाले, आरती संदीप मसलेकर, चित्रा रांजणकर व संध्या शिरापूरकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.अध्यक्षीय भाषणात सौ. माधवी देशपांडे म्हणाल्या की, कुटुंब हा समाजाचा पाया आहे. प्रथम कुटुंब संस्कारित झाले तर समाज आणि देश आपोआप संस्कारित होतो.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सुमती पिंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन महेश पिंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी वैशाली पैठणकर यांनी आभार मानले. प्रार्थना सौ. प्रज्ञा वर्तक यांनी सादर केली.कार्यक्रमाचे नियोजन जगदीश पिंगळे, सौ. शितल पिंगळे, डॉ. सौ. रेखा पिंगळे, सौ. चित्रा औसेकर, नंदिनी पिंगळे व सौ. सई धसे यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस प्रारंभ

बीड दि.९(प्रतिनिधी):– शहरातील गयानगर जालना रोड जैन मंदिराच्या पाठीमागे छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस दि.०६ मार्च शुक्रवार पासून प्रारंभ झाला आहे. या कथेची सांगता दि.१२ मार्च गुरूवार रोजी होणार आहे. शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शिवाजी महाराज पवार ( मांजरसुबा ) हे कथेचे निरुपण करत आहेत. ज्ञानयज्ञ सोहळा संपन्न होत आहे. कथा वेळ दररोज दुपारी ०२ ते सायं.०५ वाजेपर्यंत होत आहे. दि.१२मार्च शुक्रवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल. साथसंगत विजय महाराज जाधव, भीमराव महाराज डुबल, अरविंद मुळे हे देत आहेत.या कथेस भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक सुनील पिंपळे, प्रदीप पिंपळे, प्रमोद पिंपळे, शोभा पिंपळे, राणी पिंपळे, पांडुरंग वैद्य, छाया वैद्य यांच्यासह भजनी मंडळ चे बाबुराव राऊत, भानुदास वाघमारे, सुषमा मोहळकर, आश्रराबाई शहाणे, द्वारकाबाई चिरके, प्रयागबाई जाधव, गंगाबाई कोठेकर, भीमराव घाडगे, सरीता जाधव यांच्यासह छत्रपती कॉलनी, गयानगर, बीड यांनी केले आहे.

# गर्भधारणा व प्रस्तुती पूर्व लिंगनिदान तंत्राबाबत कार्यशाळेत आरोग्य सेविका व आशांना प्रशिक्षण

माजलगाव दि ९ (प्रतिनिधी)– जिल्ह्यात मुलांच्या प्रमाणात मुलींचा जन्मदर कमी होत असल्याने जनतेमध्ये जनजागृती व्हावी म्हणून येथील ग्रामीण रुग्णालयात गर्भधारणा व प्रस्तुती पूर्व लिंगनिदान तंत्राबाबत माहिती मिळावी म्हणून कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये आरोग्य सेविका व आशांना प्रशिक्षण देण्यात आले.

१९९४ घ्या सुधारित २००३ चा कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सोनोग्राफी केंद्र धारक , गर्भपात केंद्र धारक व स्त्री रोग तज्ञ असलेले डॉक्टर, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका, आशा यांची कार्यशाळा येथील ग्रामीण रुग्णालयात घेण्यात आली. यावेळी कायदेशीर सल्लागार एन.बी.जोशी , डॉ.एल.आर.तांदळे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे, डॉ.मधुकर घुबडे, डॉ. योगिता भगत , डॉ.सुमित कदम आदींची उपस्थिती होती.

यावेळी सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा गैरवापर होऊ नये, गर्भलिंग होऊ नये म्हणून तालुका स्थरीय कमीटी करण्यात आली यामध्ये तालुका समोचीत प्राधिकारी अधिकारी म्हणुन डॉ. सुरेश साबळे यांची नेमणूक करण्यात आली. यावेळी गाव पातळीवर विलेज हेल्थ प्लॅन तयार करण्यात आला . प्रत्येक गावातील ग्रामपंचायतीच्या फलकावर महिन्याला जन्मलेल्या बाळाची नोंद करण्यात येणार आहे , गाव पातळीवर मुला मुलींचे युवा पथक तयार करण्यात येणार आहे यासह या विषयाबाबत विविध उपाय योजनांवर विचारविनिमय करण्यात आला. दरम्यान बीड जिल्ह्याचा मुलांच्या जन्मतारापेक्षा मुलींचा जन्मदर १ हजारामागे ९२५ होती परंतु २०२५ मध्ये मुलांचा जन्मदर १ हजारामागे ८८० झाला असल्याने आरोग्य विभागाकडून विविध कार्यशाळेचे आयोजन करून यामध्ये जनजागृती करण्याचे काम करण्यात येऊ लागली आहे.

साखर कारखाने बंद पडले तरी देखील


# रस्त्या अभावी राजेगावच्या भागवत गरड यांचा ऊस शेतातच उभा



### तहसीलदारांच्या रस्ता मोकळा करून देण्याच्या आदेशाला केराची टोपली

माजलगाव दि ९ (प्रतिनिधी)– तालुक्यातील राजेगाव येथील शेतकरी भागवत सटवाजी गरड यांच्या शेताकडे जाण्यासाठीचा गट नंबर ४४६, ४४७ या नंबर बांधावरील जाणारा रस्ता शेजारच्या शेतकऱ्यांनी तारीचे कुंपण करून अडवल्यामुळे त्यांचा उसाचा ऊस शेतातच उभा राहण्याची वेळ आली आहे. साखर कारखाने बंद पडण्याच्या स्थितीत असतानाही रस्ता नसल्यामुळे ऊस बाहेर काढता येत नसल्याने गरड यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर रस्ता करून देण्याबाबत तहसीलदारांचा आदेश असताना काहीच कारवाई होत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. तालुक्यातील राजेगाव येथील भागवत गरड यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर उसाचे पीक उभे आहे. मात्र शेजारील शेतकऱ्यांनी गट नंबर ४४६, ४४७ या नंबर बांधावरील शेताकडे जाणारा रस्ता अडविल्याने उसाची वाहतूक करणे अशक्य झाले आहे. याबाबत गरड यांनी प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर तहसीलदारांनी रस्ता मोकळा करून देण्याचे आदेश दिले होते. तरीदेखील संबंधितांकडून आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.सध्या उसाचा हंगाम संपत आला असून अनेक साखर कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत रस्ता नसल्यामुळे ऊस शेतातच राहिल्यास संपूर्ण पीक वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी भागवत गरड यांचेकडून करण्यात येत आहे. याप्रकरणी प्रशासनाने तत्काळ कारवाई करून शेतकऱ्याला न्याय द्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.शेतकरी भागवत गरड म्हणालेकी तहसीलदारांनी आदेश दिल्यानंतरही तहसील प्रशासन व मंडळ अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे रस्ता मोकळा होत नाही असा आरोप करत प्रशासनाने तातडीने कारवाई करून न्याय द्यावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी भागवत गरड यांनी दिला आहे.

## आज कुसळंब ते श्री.क्षेत्र शिर्डी पायी दिंडी पालखी सोहळ्याचे प्रस्थान



पिंपळवंडी दि.९(प्रतिनिधी) – प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री. साईनाथ मंदिर कुसळंब (ता.पाटोदा) ते श्री.क्षेत्र शिर्डी साईबाबा पायी दिंडी पालखी सोहळा दि.१० ते १७ मार्च २०२६ दरम्यान आयोजित केला असून पायी दिंडी पालखीचे आज मंगळवार दि १० मार्च रोजी येथील खंडेश्वर मंदिरात साईबाबा पादुकांचे पूजन करून सकाळी १० वाजता प्रस्थान होणार आहे. पायी दिंडी पालखी पिंपळवंडी, अंमळनेर,मोहटा,मढी, शनिशिंगणापूर,श्रीरामपूर मार्गे शिर्डी येथे मंगळवार दि १७ मार्च रोजी पोहोचणार असून,या पायी दिंडी पालखी सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मुकुंद भराटे महाराज,ह.भ. प.गहिनीनाथ महाराज मिसाळ, पुजारी हनुमंत धनवटे महाराज यांनी केले आहे.पायी दिंडीच्या मुक्कामाचे ठिकाणे पुढील प्रमाणे दि.१० मंगळवार रोजी श्री.क्षेत्र रामगड संस्थान चिंचपूर पांगुळ,दि.११ बुधवार रामदास शिंदे धामणगाव देवी (ता.पाथर्डी),दि.१२ गुरुवार बर्डे गुरुजी पारेगाव (ता.पाथर्डी),दि.१३ शुक्रवार गणेश पुंड रुपेवाडी (ता. पाथर्डी),दि.१४ शनिवार भानुदास नामदेव घोरपडे महादेव मंदिर खेडले प्रेमानंद (ता.नेवासा),दि.१५ रविवार कडू पाटील वस्ती वांगी (ता. श्रीरामपूर),दि.१६ सोमवार श्रीराम मंदिर भोसलेवाडी उंबरगाव (ता. श्रीरामपूर) असे आहेत.पायी दिंडी मार्गातील वाड्या वस्ती व गावोगावातील ग्रामस्थांच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी व मुक्कामाच्या ठिकाणी चहा नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# नगरअध्यक्षा सौ.प्रांजलताई चिंतामणी यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन




जामखेड (प्रतिनिधी) : जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण विकास केंद्र, जामखेड व कोरो इंडिया, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जामखेड येथे जिल्हास्तरीय युवती, विवाहित, एकल, विधवा व परित्यक्ता महिलांसाठी दोन दिवसीय विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा दि. ७ व ८ मार्च २०२६ रोजी निवारा बालगृह, मोहा फाटा, समता भूमी, जामखेड जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडल्या.

महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच महिलांना सन्मान मिळावा यावा संविधानिक मूल्य माहित असावेत आपल्या हक्क व अधिकार कळावेत या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांना संविधानाने दिलेल्या अधिकारांची जाणीव व्हावी आणि समाजात समानता व स्वाभिमानाची भावना बळकट व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नवनिर्वाचित नगरअध्यक्षा सौ. प्रांजलताई चिंतामणी यांच्या हस्ते संविधान प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आले. कार्यक्रमास सरपंच भीमराव कापसे (मोहा), सोनम धीवर कोरो इंडिया मुंबई, नगरसेविका सौ. संगीता भालेराव, सौ.जया गव्हाळे, सौ.आशाबाई टकले, येडेश्वर नागरगोजे, संतोष हापटे सर, सचिन चव्हाण अभिनेता, सुरेखाताई सदाफुले आदी मान्यवर उपस्थित होते. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पायल ताई बाफना (उद्योजक) होत्या तर प्रमुख पाहुणे अलकाताई जाधव सविता मोरे संजय लहाने उद्योजक सोमनाथ भैलुमे दत्ता भालेराव अप्पा सरोदे रूपाली आढाव उपस्थित होते.

# गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कारवाई करा–आ.सुरेश धस

### मुलींचे संरक्षण, पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी आणि ऊसतोड महिला कामगारांच्या प्रश्नांवर सभागृहात वेधले लक्ष

पाटोदा/महेश बेदरे

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिरूर-आष्टी-पाटोदा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी सोमवार दिनांक ९ मार्च रोजी गर्भलिंग तपासणी, मुलींचे संरक्षण आणि ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर ठाम आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. राज्यात पुन्हा गर्भलिंग तपासणीचे प्रकार समोर येत असल्याबद्दल त्यांनी गंभीर चिंता व्यक्त करत, अशा प्रकारांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कठोर कारवाई करण्याची मागणी केली.



सभागृहात बोलताना आमदार धस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''समाजात मुलगा-मुलगी समान आहेत असे आपण बोलतो; मात्र प्रत्यक्षात अजूनही मुलींबाबत भेदभावाची मानसिकता दिसून येते. मुलींचे अस्तित्व सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर पावले उचलणे ही काळाची गरज आहे. काही वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर अत्यंत चिंताजनक पातळीवर गेले होते. हजार मुलांमागे केवळ ६२८ मुली इतके प्रमाण नोंदवले गेले होते. विशेषतः शिरूर तालुक्यात ही स्थिती गंभीर होती. त्या काळात सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या प्रयत्नांमुळे परिस्थितीत सुधारणा झाली. मात्र आज पुन्हा काही ठिकाणी गर्भलिंग तपासणीचे प्रकार उघड होत असल्याने हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.यावेळी त्यांनी Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act (पीसीपीएनडीटी कायदा) प्रभावीपणे राबवला जातो का, याचा आढावा घेण्याची मागणी केली. जर हा कायदा अपुरा ठरत असेल, तर त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा. गर्भलिंग तपासणी करून मुलींचे गर्भपात करणाऱ्या डॉक्टर, एजंट आणि टोळ्यांवर कठोर कारवाई करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीप्रमाणे गुन्हे दाखल करावेत, असेही त्यांनी नमूद केले.ग्रामीण भागात मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे सामाजिक असंतुलन निर्माण होत असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. काही ठिकाणी बाहेरच्या राज्यांतून मुली आणून विवाहाच्या नावाखाली फसवणूक होत असल्याच्या घटनाही समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले.याचबरोबर ग्रामीण भागातील ऊसतोड महिला कामगारांची कठीण परिस्थितीही आमदार धस यांनी मांडली. अपुऱ्या आरोग्य सुविधा, कमी हिमोग्लोबिन, प्रचंड शारीरिक श्रम आणि गर्भारपणातही काम करण्याची वेळ येत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली. महिला कामगारांसाठी आरोग्य तपासणी, सॅनिटरी नॅपकिनची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित कामाच्या परिस्थितीबाबत ठोस धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली.समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करायची असेल, तर मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि संपत्तीतील हक्क याबाबत ठोस पावले उचलली पाहिजेत, असे मतही त्यांनी व्यक्त केले. मुलींचे संरक्षण, त्यांचे सन्मानाने जगणे आणि ग्रामीण महिलांचे प्रश्न सोडवणे ही केवळ शासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याची ठाम भूमिका आमदार धस यांनी सभागृहात मांडली.

# स्त्री शक्तीचा सन्मान समाजाने कायमच करावा–डॉ.मंजुषा रसाळ

चौसाळा दि ९ (प्रतिनिधी)– बीड तालुक्यातील चौसाळा येथील कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा महाविध्यालयात समाजशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ८ मार्च हा जागतिक महिला दिन महिला कर्मचारी (प्राध्यापक) यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून साजरा करण्यात आला या वेळी व्यासपीठावरील क्रांतीजोती सावित्रीबाई फुले व माजी खासदार लोकनेत्या स्वर्गीय केशरबाई (काकू) क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थितांचा विभागप्रमुख डॉ. विलास भिल्लारे यांच्या हस्ते सत्कार करून प्रास्ताविक केले.




या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मंजुषा रसाळ, प्राचार्य डॉ. पंडित खाकरे, पी. जी. डायरेक्टर डॉ. सुधाकर वनवे, प्रा. गणपती ढवळशंख व्यासपीठावर उपस्थित होते यावेळी बोलताना डॉ. रसाळ यांनी समाजाच्या प्रगती मध्ये स्त्री चा मोठा वाटा असून, अनेक कर्तुत्ववान स्त्रियांचा सविस्तर इतिहास सांगून केवळ एका दिवशीचा बैलपोळ्या प्रमाणे स्त्रीचा सन्मान न करता कायमच त्यांना सन्मान द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. तर अध्यक्षीय सामारोपामध्ये डॉ. खाकरे यांनी स्त्रियांनी संस्कृतीचे संवर्धन करून सामाजिक रूढी परंपरा जपण्याचे आवाहन केले. या वेळी डॉ. वनवे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा.सौ. रेवागडे यांनी स्त्री जन्मावर कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती हंगे यानिकेले तर आभार प्रा. सौ. धामणगावकर यांनी केले. या वेळी श्रीमती खडके मैडम , श्रीमती सवाई मैडम, प्रा. ताटीकोंडीलवार मैडम, प्रा. तुवर मैडम, डॉ. कदम एस. जी., डॉ. साबळे पी. आर. डॉ. माने एस. एम. डॉ. साळुंखे के.ए. डॉ. अलदे ए.ए. श्रीमती देशमुख मैडम इत्यादी कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेने बदल घडविला

### हिंगणी येथे ॲड.राजेश शिंदे यांचे प्रतिपादन

बीड (प्रतिनिधी) :गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेने राबवलेल्या विविध उपक्रमांमुळे हिंगणी बुद्रुक गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे. त्यांनी केलेली चिरंतन विकासकामे पाहून आम्ही भारावून गेलो आहोत, असे प्रतिपादन ॲड. राजेश शिंदे यांनी केले.

धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथे एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ८ मार्च) जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरुन ॲड. राजेश शिंदे बोलत होते. या कार्यक्रमाला सरपंच योगेश सोळंके, दैनिक पुण्यभूमीचे कार्यकारी संपादक सुनील डोंगरे, सुशीलकुमार उजगरे, समाजसेविका निकिता तिडके, परमेश्वर गोंडे पाटील, रजनिकांत वाघमारे, विनोद जाधव आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना ॲड. शिंदे म्हणाले की, समाजाच्या विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. महिला सक्षम झाल्यास कुटुंब आणि समाज दोन्ही मजबूत होतात. त्यामुळे महिलांना शिक्षण, कौशल्य आणि संधी देणे ही काळाची गरज आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांनाही संधी मिळाल्यास त्या विकासाची नवी दिशा देऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेच्या माध्यमातून हिंगणी बुद्रुक येथे गावाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. पाणी व्यवस्थापन, बाजार शेडची निर्मिती, शाळेला आधुनिक संगणक प्रणाली, महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम, प्रवाशांसाठी निवारा तसेच किसान भवनाची उभारणी यांसारख्या कामांमुळे गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडली आहे. तसेच किसान भवनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेत मशागतीसाठी केवळ २०० रुपयांत यंत्रसामुग्री, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत असून पैशांची देखील बचत होत आहे. याशिवाय नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठीही प्रभावी पाणी व्यवस्थापन राबवले जात आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गावातील महिलांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी दिलासा संस्थेचे कर्मचारी एकनाथ शिंदे, सौदागर मुंडे व अमोल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महिला दिनानिमित्त ऊसतोड मजूर महिलांच्या प्रश्नांवर चर्चा ; विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

बीड (प्रतिनिधी) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त श्री. बबनरावजी माने (अध्यक्ष, जय महाराष्ट्र ऊसतोड कामगार संघटना व मा. पंचायत समिती सदस्य, बीड) यांच्या वतीने महिला दिनाचा कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सत्कार व त्यांच्या कार्याचा गौरव अध्यक्ष बबनरावजी माने आणि सचिव सुवर्णा निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये ह.भ.प. प्रज्ञाताई रामदासी, प्रा सुशिला मोराळे, नगरसेविका सारिका क्षिरसागर, ह.भ.प. शिवानी जरंगे, माजी प्रा. सविता शेटे, दैनिक कार्यारंभच्या पत्रकार श्वेता घाडगे, सीमा कोकणे, पत्रकार अनीता भोसले, ड. भाग्यश्री ढाकणे, संगीता सपकाळे, भागवती परदेशी, समाजसेविका मिरा डावकर, ह.भ.प. प्रतीमा गायकवाड व माधुरी मुंडे यांचा समावेश होता.

यावेळी सत्कारमूर्ती महिलांनी आपापल्या क्षेत्रातील अनुभव, संघर्ष आणि यशाची उदाहरणे देत मनोगत व्यक्त केले. समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांनी जिद्द, कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमात बोलताना बबनरावजी माने यांनी विशेषतः ऊसतोड मजूर महिलांच्या समस्या आणि त्यांच्या कठीण जीवनस्थितीवर भाष्य केले. आजही अनेक ऊसतोड मजूर महिलांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अत्यंत कष्टाची मजुरी करावी लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयाची एक दिवशीय अभ्यास सहल संपन्न

बीड (प्रतिनिधी) : दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी वसंत दादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने नायगाव मयूर अभ्यारण्य या ठिकाणी विज्ञान विभागाच्या एक दिवशीय सहलीचे आयोजन करण्यात आले या सहलीत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून विविध वन्यप्राणी पक्षी व जैवविविधतेबद्दल प्रत्यक्ष निरीक्षणातून माहिती घेतली. तसेच तिथे असनाऱ्या सोलार पॉवर स्टेशनला भेट देऊन कशा पद्धतीने वीज निर्मिती केली जाते त्याबद्दलची सखोल माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. सहली दरम्यान विद्यार्थ्यांना प्राण्याचे अधिवास, त्यांचे वर्तन तसेच वनस्पती व पर्यावरणाची असलेले त्यांचे नाते याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. नायगाव अभयारण्यातील कार्यरत असणारे वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रजातीबद्दल सविस्तर माहिती देत अभ्यास अधिक रंजक केला. सहलीमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला. एकूण ३२ विद्यार्थी सहलीसाठी उपस्थित होते. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. बळीराम राख उपप्राचार्य डॉ.अभय शिरसागर प्रा. नामदेव चांगण तसेच पर्यवेक्षक जोगदंड अनिल पी.जी.संचालक डॉ.गणेश पाचकोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.सहल यशस्वी करण्यासाठी प्रणिशास्त्र विभागप्रमुख डॉ.पी. बी.सिरसट, डॉ.एम. के.काळे डॉ. ऐ. एन. धारासुरकर डॉ. पी.आर. महेशमालकर डॉ. जे. डब्ल्यू.श्रीमंगले व डॉ.आशोक नाईक यांनी परिश्रम घेतले.

# महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज–डॉ.माधुरी रेवणवार

### महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा माजलगाव ; विकास प्रतिष्ठानचा महिला मेळावा उत्साहात

माजलगाव दि ९ (प्रतिनिधी)–महिलांनी आधुनिक ज्ञान आणि विज्ञानाच्या आधारे शेती व सामाजिक कार्यात पुढे येणे आवश्यक आहे. सेंद्रिय शेतीसारख्या उपक्रमांद्वारे महिलांनी स्वावलंबी होत समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे. महिलांनी सेंद्रिय शेतीकडे वळणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी केले. त्या माजलगाव विकास प्रतिष्ठानतर्फे आयोजित महिला मेळाव्यात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगलाताई सोळंके या होत्या. कार्यक्रमाची सुरुवात आम्ही घासून ठेवली ग्रामसभेची तलवार या प्रेरणादायी गीताने झाली. रेखा होके यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. तसेच सखाराम जोशी आणि प्रवीण मडके यांच्या दिग्दर्शनाखाली सामाजिक आशयाचे पथनाट्य लढा महिला राजसत्तेचा शाळेच्या शिक्षिकांनी सादर केली. नीला देशमुख यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ॲड.पल्लवी सोळंके यांनी शक्ती कायदा याबाबत महिलांना सविस्तर माहिती दिली. आपल्या भाषणात भीम रासकर यांनी महिलांना प्रेरणा देताना आम्ही सख्या नाही पण पक्क्या बहिणी, सांदी कोपऱ्यात राहायचं नाय, राज्य करायला घाबरायच नाय, अशा घोषणा महिलांनी दिल्या. अनेक महिला सरपंचांच्या चातुर्याचे अनुभव सांगत महिलांनी व्यापक राजकारणावरही बोलले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेनं किमान एक सत्ता केंद्र काबीज करण्याचा प्रयत्न करावा, ग्रामपंचायतीचे काम प्रत्यक्ष पाहावे आणि विरोधकांशी संवाद साधायला शिकावे, असेही त्यांनी नमूद केले. महिलांच्या चारित्र्यावर अनेकदा हल्ले केले जातात, मात्र अशा वेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील स्वावलंबी महिलांचा सत्कार व्हावा आणि महिलांनी जे जमत नाही तेही करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांचा खरा दागिना म्हणजे ताठ मान आणि ताठ कणा असे प्रभावी प्रतिपादनही त्यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र, सगरोळीच्या संचालिका डॉ. माधुरी रेवणवार यांनी आपल्या भाषणात ज्ञान आणि विज्ञान यांच्या साहाय्याने सेंद्रिय शेती करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शेतीतील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानगंगा शेतकरी बचत गट तसेच हिरकणी महिला शेतकरी गटाचा सत्कार करण्यात आला. प्रीती कदम यांचा सेंद्रिय शेती करत असल्यामुळे सत्कार करण्यात आला. यावेळी माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या 'दिशा परिवर्तनाच्या ' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजलगावच्या नगराध्यक्षा शिफा चाऊस यांनी मनोगत व्यक्त करताना मी नगराध्यक्षा असले तरी त्यापूर्वी आई, बहीण आणि सून आहे. त्यामुळे तुमचे दुःख हे माझे दुःख आहे, असे भावनिक मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी ॲड.पल्लवी सोळंके, मस्साजोगच्या सरपंच वर्षा सोनवणे, समाजसेवक धनंजय देशमुख, कवी प्रभाकर साळेगावकर, डॉ. जनक चौरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षिका शालिनी गडाख आणि अनुराधा सोळंके यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वरुण तौर यांनी मानले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मंगलाताई सोळंके यांनी माजलगाव विकास प्रतिष्ठान असेच सामाजिक उपक्रम घेत राहील अशी ग्वाही दिली. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या संघटिका उर्मिला चोपडे, शोभा डाके,प्रभा गंगणे आणि राधा शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

## पार्वतीबाई भुते यांचे निधन

गेवराई दि.९ (प्रतिनिधी) :- गेवराई



येथील राष्ट्रीय कबड्डीपटू गणेश भुते यांच्या मातोश्री पार्वती शंकर भुते यांचे वयाच्या ११० वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी चिंतेश्वर स्मशानभूमी गेवराई याठिकाणी करण्यात आला. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावाई, नातवंडे-पतवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीसाठी गेवराई पान २ वर


# पार्श्वभूमी


बीड : शहरातील अलीजा शेख शाकेर हिने वयाच्या ७ व्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. त्याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.





# नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती-परिवहन मंत्री



मुंबई, दि.९(जिमाका) : राज्यातील वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आजपासून म्हणजेच ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाणार असून, त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे माहिती मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य शासनाला याबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्यास सांगितले आहे.

महाराष्ट्राचे परिवहन मंत्री या नात्याने केंद्र शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य शासनाला प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने लास्ट माईल कनेक्टिव्हिटी पान २ वर

### परिवहन मंत्री काय म्हणाले?..



**महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असून शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य शासनाला याबाबत स्थानिक परिस्थिती नुसार निर्णय घेण्यास सांगितले आहे.**

# सरसकट कर्जमाफी नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी

पिंपळनेर दि ९(प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा करण्याची घोषणा केली होती. परंतु, तशी घोषणा न झाल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत.

गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी होणार, सातबारा कोरा होणार, अशा चर्चा होत्या. जून २०२६ पूर्वी हा निर्णय घेऊ, असेही सत्ताधारी नेत्यांनी सांगितले होते. अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेवेळी कर्जमाफीतील अटी, तरतुदी, पात्र या शब्दांमुळे पुन्हा एकदा शेतकरी हवालदिल झाला आहे.शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणे तर दूरच; परंतु दोन लाखांपर्यंतचे कर्ज नेमके कसे माफ होणार, हेदेखील स्पष्ट करण्यात आलेले नाही. स्थानिक स्वराज्य निवडणूक कालावधीमध्ये शेतकऱ्यांचे कर्ज माफ होणार, असे बोलले जात होते. त्यामुळे कर्जाचे हप्ते भरावेच लागणार नाहीत, अशी शेतकऱ्यांची समजूत झाली होती. आता शेतकरी संताप व्यक्त करीत आहेत.नियमित कर्जफेड करतात, त्यांच्या हातात काहीच लागणार नसल्याचे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत. ही कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केला.शेतकरी हा नियमित कर्ज परतफेड करतो.तरीही आजपर्यंत कोणतेही प्रोत्साहनपर अनुदान मिळाले नाही. मागील कर्जमाफीवेळी ते जाहीर केले गेले होते. पुढेही ते मिळेल की नाही, शंकाच आहे.

# विनयभंग व बाललैगिंक अत्याचार केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता

माजलगाव दि.९(प्रतिनिधी)- या प्रकरणाची अधिक माहिती अशी की, दि.२९/०५/२०१८ रोजी पोलीस स्टेशन दिंद्रुड येथे पिडीतेने अशी तक्रार दिली होती की, आरोपी बाळु लक्ष्मण पवार हा दारु पिवून घरासमोर आला व पिडीतेस लज्जा वाटेल असे बोलून तिची ओढणी ओढून पिडीतेने त्यास हिसका देवून घरात गेली व दार बंद करून घेतले त्यावेळी पिडीतेची आई घरातच होती. व झालेला प्रकार तिचे आईला सांगत असतांना आरोपीने घरासमोरील दगडे घेवून पिडीतेचे दरवाज्यावर मारले, घाण घाण शिवीगाळ केली व घराचे आजुबाजुला फिरत होता व कोणाला सांगितले जिवे मारून टाकील अशी धमकी दिली. ही फिर्याद प्राप्त झाल्यावरुन दिंद्रुड पोलीसांनी आरोपींविरुध्द गु.र.नं. १००/२०१८ कलम ३५४ (अ), ३३६, ५०४, ५०६ भा.द.वि. सह कलम ७, ८,११ (१), १२ पोक्सोक्ट प्रमाणे गुन्हा नोंदवुन तपासाअंती दोषारोपपत्र कोर्टात पाठवले होते. त्यास सेशन केस नं. ०९/२०२३ देण्यात आला.या प्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायाधिश माजलगाव यांचे न्यायालयात खटला सुरु होता. त्यानंतर सदर प्रकरण केज येथे अतिरीक्त सत्र न्यायाधिश यांची स्थापना झाल्यानंतर मा. अतिरीक्त सत्र न्यायाधिश केज यांचे न्यायालयात प्रकरण चालले.या प्रकरणी सरकार पक्षातर्फे एकुण ०६ साक्षीदार तपासण्यात आल्यानंतर दोन्ही बाजूंचा व्युक्तीवाद ऐकल्यानंतर अतिरिक्त सत्र न्यायाधिश एस. बी. भाजीपाले यांनी या प्रकरणी सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा विसगंत आहे असे निरिक्षण नोंदवुन तसेच आरोपीचे वतीने आलेला पुरावा व केलेला पान २ वर

## खून केल्याच्या आरोपातुन संतोष कवठेकर निर्दोष मुक्त

बीड दि.९(प्रतिनिधी):- नारायणगड



परीसरात दि.७/०९/२०२३ रोजी गावातील इसमाचा खून केल्याच्या आरोपातून संतोष कवठेकर व बाळू ठोसर यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याची माहिती अॅड.दिनेश हंगे यांनी दिली.

सदर मारहाणीचा प्रकार नारायणगड येथील सिसीटिव्ही कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाले. त्यात दोन्ही आरोपी मारहाण करत असल्याचे मयताच्या मुलाने रेकॉर्डींग पाहून सांगितले होते. या प्रकरणात सरकारतर्फे तब्बल ३२ साक्षीदार तपासण्यात आले होते. आरोपीची परेडही झाली होती. परंतु आरोपीचे वकीलाचा बचाव ग्राह्य धरून सत्र न्यायालयाने दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात दोन्ही आरोपींकडून अॅड.दिनेश गोवर्धन हांगे यांनी काम पाहीले. त्यांना विलास सगळे, सय्यद साजेद, सुरेश कांबळे, अभिजीत गलधर यांनी सहकार्य केले.

# बीडमध्ये रमजान निमित्त ईद बाजार गजबजणार

**विविध प्रकारचे २०० पेक्षा अधिक स्टॉल लागणार ; रेस्टॉरंटसह आनंदनगरीही लक्षवेधी ठरणार-शेख,पठाण**







बीड ( प्रतिनिधी):-रमजान ईदच्या निमित्ताने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टीपर्पज) मैदानावर भव्य ईद बाजार भरविण्यात येणार आहे. नागरिकांकडून याचे जोरदार कौतुक होत आहे. नियोजनबद्ध पद्धतीने सजवलेल्या या बाजारपेठेत २०२ गाळ्यांची व्यवस्था करण्यात आली असून ईदसाठी लागणारी सर्व वस्तू एकाच ठिकाणी मिळणार आहे.महिलांसाठी विशेष आकर्षण असलेल्या या बाजारात फक्त खरेदीच नव्हे, तर रेस्टॉरंटची सुविधाही उपलब्ध केली आहे. लहान मुलांसाठी झुले, खेळणी आणि आनंदनगरीची मजा ठरणार आहे. बाजार सुरळीत चालावा यासाठी पोलिस बंदोबस्त, १०० ते १५० स्वयंसेवकांची टीम आणि महिलांसह मुलांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे.हा बाजार ११ मार्चपासून सुरू होणार असून, ईद संपल्यानंतरही पाच दिवस चालणार आहे. बुकिंग सुरू असून, नागरिकांनी एकाच ठिकाणी खरेदी करून आनंदनगरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बरकत पठाण, शेख वसीम, शेख समीर जहीर यांनी केले आहे. तसेच दुकानाच्या बुकिंग साठी फैजान रहेमान मोबाईल पान २ वर

**वृक्षप्रेमींनी जाहीर निषेध करत केली कारवाईची**

# यशवंत उद्यानात केलेल्या वृक्षारोपणातील झाडे अज्ञात समाजकंटकाने उपटून टाकली

बीड दि ९(प्रतिनिधी) - काही चांगले नाही करता आले तर करु नका पण वाईट तरी करु नका असे म्हणत बीडच्या डॉ .आंबेडकर पुतळ्या जवळील यशवंत उद्यानात लावलेल्या वृक्षाची कोणीतरी समाज विघातक व्यक्तीने झाडे उपटून नासधूस केली. यासंदर्भात वृक्षप्रेमीनी जाहीर निषेध केला व या प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर कठोर कारवाई करावी अशी मागणी देखील करण्यात आली.

याबाबत नमूद करण्यात आले की बीडच्या बिंदुसरा नदिच्या काठी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या समोर यशवंत पान २ वर



## बीडमधुन तरूण बेपत्ता

बीड दि.९(प्रतिनिधी):- शहरातील अंकुश नगर भागातील रोहन कल्याणराव कोलगंडे (वय ३६) हे दि.२४ फेब्रुवारी २०२६ रोजी वॉकींग करून येतो म्हणून असे म्हणून घराबाहेर पडले ते पुन्हा घरी परतले नाही. या संदर्भात कुटूंबियांनी सर्वत्र शोध घेतला. परंतु त्यांच्याविषयी कसलीच माहिती मिळाली नाही. त्यांचे दोन्ही मोबाईल घरीच आहेत. या प्रकरणात पान २ वर



## माजी मंत्री बदामराव पंडित यांच्याकडून शनिवारी इफ्तार पार्टीचे आयोजन

गेवराई (प्रतिनिधी):- मुस्लिम बांधवांच्या रमजान या पवित्र उपवासाच्या महिन्यानिमित्त लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने दिनांक १४ मार्च २०२६ रोजी गेवराई येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बदामराव पंडित यांनी केले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने दरवर्षी मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिना निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. यावर्षी दिनांक १४ मार्च २०२६ रोजी नगर परिषद शॉपिंग सेंटर येथे सायंकाळी या इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांनी केले आहे.



# आ.भारतीय यांनी पत्रकार व विक्रेत्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले

**महामंडळे लवकरच कार्यान्वित होणार ;सरकारची ग्वाही**

मुंबई दि.९(प्रतिनिधी):- विधान परिषदेत आ. श्रीकांत भारतीय यांनी राज्यातील वृत्तपत्र व पत्रकार आणि विक्रेत्यांच्या अडचणी सभागृहासमोर मांडत सरकारकडून तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. त्यांच्या लक्ष वेधिवर सोमवारी सभागृहात सविस्तर चर्चा झाली आणि सरकारला याबाबत भूमिका स्पष्ट करावी लागली. मंत्री आशिष शेलार यांनी पुढील अधिवेशनापूर्वी पत्रकार व विक्रेत्यांसाठीचे महामंडळ स्थापन होईल आणि पत्रकारांचे प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित मागण्यांवर निर्णय घेतला जाईल अशी ग्वाही दिली.

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. सोमवार (९ मार्च) रोजी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे आमदार श्रीकांत भारतीय यांनी राज्यातील नोंदणीकृत वृत्तपत्रे, त्यात काम करणारे पत्रकार तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांसमोर विशेषता कोरोना महामारीनंतर उभ्या राहिलेल्या अडचणींचा मुद्दा उपस्थित केला. भारतीय म्हणाले, माध्यम क्रांतीनंतर, समाजातील घडामोडी, बातमी, माहिती प्रश्न आणि शासनाच्या धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात वृत्तपत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अलिकडे डिजिटल माध्यमांचा विस्तार झाला असला तरी वृत्तपत्रांची विश्वासार्हता कायम आहे. पान २ वर

## घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच जमा होणार; मंत्री जयकुमार गोरे यांची ग्वाही

मुंबई, दि.९ : विदर्भ-कोकण ग्रामीण बँकेच्या विलीनीकरणामुळे तांत्रिक अडचणीत सापडलेल्या मंगळवेढा तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचे थकीत अनुदान लवकरच त्यांच्या खात्यावर जमा केले जाईल, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले.मंगळवेढा मतदारसंघातील घरकुलाना निधी वितरित न होणे, घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू न मिळणे, जागेचे प्रलंबित प्रस्ताव आणि मनरेगाच्या थकीत मजुरीबाबतही आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले की, बँक विलीनीकरणामुळे आयएफएससी (खञ्ख्ड्ड) कोड बदलल्याने पेमेंट प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. सध्या नवीन खाती अपडेट करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांचे पैसे डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यात वर्ग केले जातील. एकाही लाभार्थ्याचे पेमेंट थांबणार नाही, ही शासनाची ठाम भूमिका आहे. पान २ वर

# मदनलाल सारडा राजस्थानी प्रा.विद्यालयात क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

बीड दि.९(प्रतिनिधी):- शहरातील राजस्थानी सेवा समाज संचलित, मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते शनिवार दि.७ मार्च रोजी संपन्न झाले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते चौथी या वर्गांसाठी विविध खेळ घेण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. या




कार्यक्रमासाठी राजस्थानी सेवा समाजाचे अध्यक्ष श्री विष्णूदासजी तापडिया, प्रमुख पाहुणे सहसचिव किशोरकुमार बाहेती हे होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध खेळ त्यामध्ये सांघिक व वैयक्तिक खेळ घेण्यात आले. ज्यात वैयक्तिक खेळामध्ये संगीत खुर्ची, धावणे, दोरीवरिल उड्या, अडथळ्यासह धावणे या खेळांचा समावेश होता. सांघिक खेळामध्ये मुलींसाठी लंगडी व खो खो,१ ली २ री मुलांसाठीरस्सीखेच,३ री ४ थी मुलांसाठी पान २ वर

# स्वंय प्रेरणा मनातील इच्छा शक्ती व दृढनिश्चय ध्येय साध्य करताना उपयोगी पडते-पूजा खडकीकर

बीड दि.९(प्रतिनिधी):- ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दीन दयाल शोध संस्थान बीड मध्ये .विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या बीड शहरातील मातृशक्तीचा सन्मान अखिल भारतीय इतिहास संकलन योजना नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत बीड जिल्हा शाखा वतीने आयोजित करण्यात आला .

या सन्मान सोहळ्याचे अध्यक्ष स्थानी मा पुजाताई खडकीकर (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बीड व प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री गंगाधर देशमुख (पं दीनदयाळ शोध संस्थान बीड )मातृशक्ती मध्ये सौ. मनिषा भाऊराव पवार (वृध्दाश्रम सेवा ) सौ. मयुरी सुरेश राजहंस (सेवाश्रम) सौ. उमा सुनील औटे (गो सेवा), सौ. मुक्ता राम चौधरी ( रुग्ण अन्नदान) व सौ. आशा गणेश देशपांडे ( स्वंय उद्योजिका) यांचा भव्य सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास संकलन संस्था बीड सचिव श्रीकृष्ण जोशी यांनी केले . सूत्र संचालन अत्यंत प्रभावीपणे व विविध काव्यांचा आधार घेत सौ शारदा मुकुंद कुलकर्णी यांनी केले .या समारंभात सत्कार मुर्तीनी आपले मनोगते व्यक्त केली त्यातून आपल्या कामाचा आलेख सर्व महिला व बंधुसमोर मांडला. सर्वानी त्याच्या कामाचा आधार बनावे असे आवाहन केले. नविन पिढीसमोर अत्यंत आदर्श विचार या कार्यक्रमात समोर आले. कुटूंबाची संकल्पना व्यापक करण्याची गरज व्यक्त झाली. अध्यक्षीय समारोप करताना



मा. पुजा ताई खडीकर यांनी स्वत: या सर्व सत्कार पूर्तीच्या कार्याचा उल्लेख केले व स्वत: या भेट देण्याची इच्छा व्यक्त केली, स्वत: च्या जडणघडण मध्ये व आपल्या आई चे, बन्धुन्चे, घरातील सर्वांचे आपल्या यशस्वी वाटचालीतील योगदान आहे व त्यांच्या कष्टांमुळे मी समाजासाठी सेवा पान २ वर